# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९९ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ७ - १० |
| पृष्ठे | : | ३९ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २७**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ७-१० / जानेवारी ९९ ते एप्रिल १९९९

## संपादकीय

***काय सागरी तारू लोटले परताया मागे, असे का हा अपुला बाणा***
***त्याहून घेऊ जळी समाधी सुखे, कशासाठी, जपावे पराभूत प्राणा !***

नुकत्याच दिवंगत झालेल्या कै. कुसुमाग्रजांच्या वरील काव्य ओळींप्रमाणे सदैव पुढे जाणारी कार्यकर्त्यांची उज्वल परंपरा लाभलेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या *'दिशा'* या मासिकाच्या नवीन संपादक मंडळाने म्हणूनच मागे न फिरता पुढील वाटचाल करण्याचे योजिले आहे. त्या दृष्टीने काही बदल अपरिहार्य होतेच. सर्वप्रथम जानेवारी ते एप्रिल, १९९९ या चार महिन्यांचे अंक वेगळे न काढता एकच अंक एप्रिलमध्ये काढावयाचे ठरविले आहे. जुलै, १९९९ पासून मात्र अंक वेळेवर निघतील असा विश्वास आहे.

पुढे जाण्याआधी आतापर्यंतची यशस्वी वाटचाल करणाऱ्या संपादक डॉ. विजय बेडेकर व सहसंपादक श्री. प्रकाश वैद्य यांनी जुलै, १९९६ ते डिसेंबर, १९९८ पर्यंत दर्जेदार अंक काढल्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम अभिनंदन करणे व आभार मानणे जरुरी आहे. तसेच त्यांना या कामात सहाय्य करणाऱ्या सर्व विद्वान लेखक, सभासद, जाहिरातदार यांचेही सहाय्य मोलाचे आहे. त्यांचेही ऋण मान्य करावेच लागेल. परफेक्ट प्रिंन्टसचे श्री. विलास सांगुर्डेकर यांची यातील धडपडही प्रशंसनीय आहे.

सर्व सभासदांचे, लेखकाचे, जाहिरातदारांचे सहाय्य असेच यापुढेही मिळत रहावे हीच त्यांना नम्र विनंती.

या वर्षाच्या शेवटच्या अंकाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा !

*''अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन आशा''*

अचलकुमार टिल्लू
संपादक

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ७-१० / जानेवारी ९९ ते एप्रिल १९९९

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
श्री. संतोष राणे
श्री. संजय बोरकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
सौ. भारती जोशी
सौ. विजया भंडारे
सौ. मंगला घाटनेकर
कु. दिपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
**मुद्रक:**
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | सानेगुरुजींनी केलेली भाषांतरे | प्रा. प्रदीप कर्णिक | ५ |
| ४) | गर्जा जयजयकार.... | सौ. मंजिरी मा. दांडेकर | ९ |
| ५) | लॉर्ड जॉन मॅन्यर्ड केन्स | प्रा. दिगंबर भिडे | ११ |
| ६) | मूर्तींची मापे | डॉ. र. पु. कुलकर्णी | १२ |
| ७) | अतिरेक्यांच्या राज्यात | गणेश अनंत खराडे | १७ |
| ८) | अदिवासी क्षेत्रातील कुपोषणाची समस्या | प्रा. मोहन पाठक | २१ |
| ९) | साक्षरता अभियान | सुगंधा नारायण मुकादम | २४ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | २५ |

## श्रद्धांजली



मराठी साहित्याचा अभिमान विषय असणारे तात्यासाहेब शिरवाडकर यांचे १० मार्चरोजी निधन झाले. ज्ञानपीठ पुरस्काराचा मान मिळालेले तात्यासाहेब हे मराठी माणसाचा गौरव होते. त्यांच्या विपुल अशा साहित्याने मराठीच्या अनेक पिढ्या संस्कारीत झाल्या.

तात्या साहेबांचे निधन हा उभ्या मराठी विश्वाला दुःखात लोटणारा क्षण होता. त्यांच्या जाण्याने मराठीतील या शतकातील एक मोठा अध्याय संपुष्टात आला. त्यांच्याबद्दल लिहावे, त्यांच्याबद्दल बोलावे असे प्रत्येक मराठी माणसाजवळ बरेच आहे.

आमच्या विद्याप्रसारक मंडळ या संस्थेतर्फे व दिशातर्फे त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी ही ईश्वर चरणी प्रार्थना.

- संपादक

## सहवेदना

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनामधील वरिष्ठ लिपीक सौ. जयश्री केळकर यांचे दि. १८/४/९९ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले.

तंत्रनिकेतन मध्ये वरिष्ठ लिपिक म्हणून सौ. जयश्री केळकर ह्या १९८३ साली रुजू झाल्या होत्या. त्या त्यांच्या कामामध्ये वाकबगार होत्या. प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांनी मार्च १९९९ पासून राजिनामा दिला होता. त्यांच्या निधनाचे वृत्त तंत्रनिकेतनमध्ये कळताच दि. १९/४/९९ रोजी दु. २.३० मिनिटांनी त्यांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांतर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तंत्रनिकेतनचे उपप्राचार्य श्री. नायक यांनी सौ. केळकर याच्या कामाबद्दल प्रशंसा केली व त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. श्री. अंधारे यांनीही सौ. केळकर यांचे विषयी आपले विचार व्यक्त केले.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरकालीन शांती देवो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत.

- संपादक

# सुभाषित

१) यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् ।
स्वजनः श्वजनो मा भूत् सकलं शकलं सकृत् शकृत् ॥

२) यदा किञ्चिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।
यदा किञ्चित् किञ्चित् बुधजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

३) येषां न विद्या न तपो न दानं
ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।
ते मर्त्यलोके भुवि भारभूता
मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ॥

४) क्षान्तिश्चेद्वचनेन किं किमरिभिः क्रोधोऽस्ति चेद्देहिनां
ज्ञातिश्चेदनलेन किं यदि सुहृद्दिव्यौषधैः किं फलम् ।
किं सर्पैर्यदि दुर्जनाः किमु धनैर्विद्याऽनवद्या यदि
व्रीडा चेत्किमु भूषणैः सुकविता यद्यस्ति राज्येन किम् ॥

५) विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा
सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।
यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ
प्रकृतिसिद्ध मिदं महात्मनाम् ॥

डॉ. मो.दि. पराडकर

१) नेहमीच्या व्यवहारातही शुद्ध उच्चार आणि शुद्ध लेखन यांना खरे म्हणजे फार महत्त्व आहे, नव्हे दिले गेले पाहिजे. आज या संबंधी आम्ही शिक्षित लोकही जागरुक नाही; दूरदर्शन वर तर 'लीला' 'लिला' दिसते आणि 'प्रतीक्षा' 'प्रतिक्षा' होताना दिसते. एका व्यापाऱ्याला अचानक अजमेरला जावे लागले. त्याच्या कारकुनाने 'शेठजी आजमेर गए' ऐवजी 'शेटजी आज मर गए' असे लिहिले; तसे पाहिले तर 'मेर' आणि 'मर' यात एका मात्रेचाच फरक परंतु व्यापाऱ्याच्या घरी हलकल्लोल माजला. हे लक्षात घेऊनच एका संस्कृत सुभाषितकाराने हा श्लोक रचला असावा. तो म्हणतो, 'बाळ, जरी तू फार (बहु) शिकला नाहीस (न अधीषे) तरी व्याकरण जरूर शीक, कारण हे जर शिकला नाहीस तर तू स्वजनांना (आपल्याच आप्तांना) 'श्वजन' म्हणजे कुत्र्यात घालून टाकशील, 'सकल(सगळे) किंवा संपूर्ण यांचे 'शकल' म्हणजे तुकडे (-तुकडे करशील) आणि 'सकृत' (एकदा) चे 'शकृत्' म्हणजे शेण करून टाकशील. असे जर होऊ नये असे वाटत असेल तर बाळा, शुद्ध लिही. 'स' आणि 'श' असे निराळे आहेत तसेच तालव्य 'श' आणि मूर्धन्य 'ष' हे ही निराळे. 'शेंडी' मधला 'श' जर 'ऋषी' टाकला तर ऋषीचा निकालच लागेल. पण लक्षांत कोण घेतो ?

२) हा श्लोक सुभाषितकार भर्तृहरीने लिहिला. तो म्हणतो मला जेव्हा फार थोडे ज्ञान होते त्या वेळी एखाद्या द्विप्याप्रमाणे म्हणजे हत्तीप्रमाणे मी मदाने धुंद म्हणजे गर्वाने फुगून गेलो होतो आणि मी सर्वज्ञच असे समजून चाललो. माझे मन 'अवलिप्त' म्हणजे सर्वज्ञत्वाच्या जाणिवेने भरुन गेले होते. परन्तु जसजसा मला शहाण्या लोकांचा सहवास लाभला आणि त्यांच्याकडून थोडे कळायला लागले. (क्रगतं) तसे तसे मी मूर्खच आहे हे कळायला लागले. आणि माझा गर्व (मद) ज्याप्रमाणे ताप(ज्वर) उतरावा तसा उतरुन गेला. नाहीं तरी उथळ पाण्यालाच खळखळाट जास्त असतो. पाणी जितके खोल तितके बुडबुडे कमी; ज्ञान जितके अधिक तितका अहंकार कमी होत जातो. 'अधजल गगरी छलकत जाय' ही हिन्दी म्हण याकडेच बोट दाखवते. अहंकाराची तुलना तापाशी आणि हत्तीच्या मदोन्मत्त गंडस्थलातून वाहणाऱ्या मदाशी करण्यात औचित्य आहे. हत्ती मदोन्मत्त होतो आणि थोडे ज्ञान असणारी व्यक्ती उद्धट होते. मद हा सुद्धा हत्तीचा तापच तो अधिक बलिष्ठ हत्तीच्या समोर आला तर तो मदही उतरतो. नेहमीप्रमाणे सुभाषितकाराने (भर्तृहरी) फार थोडक्यात खरे तेच सांगितले; आपला अनुभवच सांगितला.

३) हा श्लोक ही भर्तृहरीच्या नीतिशतकातला. यात माणूस आणि इतर प्राणी किंवा पशू यांच्यातला फरक सांगितला आहे. ज्या माणसामध्ये विद्या नाही. ज्ञान म्हणजे विद्येचा योग्य उपयोग करुन घेण्याची शक्ती नाही, शीलाची ज्याला परवा नाही, गुणांची चाड नाही आणि धर्माची म्हणजे स्वकर्तव्याची जाण नाही ती माणसे म्हणून या पृथ्वीतलावर वावरत असली तरी मानवदेह धारण करणारे पशूच मानले

पाहिजेत. पृथ्वीला त्यांचा भार होतो. 'धर्म' याचे Religion असे इंग्रजीत भाषांतर करणे चुकीचे आहे; वस्तुतः धर्म म्हणजे स्वतःचे कर्तव्य कोणते आणि अकर्तव्य कोणते यातला विवेक. हे मनुष्यालाच करता येते; पशूंना नाही. विद्या आणि ज्ञान यांतला फरक लक्षांत घेतला जात नाही. विद्येचा संबंध माहितीशी अधिक असतो; आणि ज्ञानाचा अनुभवाशी. माहितीचा योग्य ठिकाणी व्यवहारात उपयोग करुन घेणे म्हणजे ज्ञान असणे. इंग्रजीत विद्या म्हणजे Information आणि ज्ञान Knowledge या दृष्टीने ज्ञान ही विद्येच्या पुढील पायरी असे म्हटले पाहिजे.

४) हा श्लोकही नीतिशतकात सापडतो. भर्तृहरी म्हणतो मनुष्यामध्ये क्षान्ति म्हणजे क्षमाशीलता किंवा सहन करण्याची शक्ती असेल तर मग 'गोड' बोलण्याचीही गरज रहाणार नाही किंवा गोड बोलणे म्हणजे वागणे नव्हे. 'शब्दां'पेक्षा कृतीला महत्त्व अधिक. (देहधारी) माणसे रागावतात हे सर्वांना माहीत आहे. भर्तृहरीने मोठा सूचक प्रश्न विचारला. जर राग माणसाजवळ असेल तर त्याला बाहेरच्या शत्रूंची (अरि) चा गरज काय ? अंगी बाणलेला राग हाच त्यांचा सर्वांत मोठा शत्रू. तो माणसावर जितकी संकटे आणतो तितके त्याचे बाह्य शत्रूही आणू शकत नाहीत. 'किमरिभिःक्रोधोऽस्ति चेद्दे हिना' वस्तुतः निबन्धाचे उत्तम शीर्षक होऊ शकेल. पुढच्या ओळीत भर्तृहरीने म्हटले तुमचे जातीबांधव किंवा आप्त असतील तर निराळ्या अग्नीची जरूर नाही. तेच आग ओकतील. संपत्तीचा वारसा लाभलेले सख्खे भाऊ आणि वहिणी ही आग ओकू शकतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. हे जसे खरे तसेच खरे मित्र असतील तरी दिव्य अशा औषधापेक्षाही अधिक उपयोग होऊ शकतो. औषधांच्या लेपापेक्षाही अधिक उपयोग होऊ शकतो. औषधांच्या लेपापेक्षा खऱ्या मैत्रीचे कवच श्रेयस्कर ठरते. दुर्जन म्हणजे वाईट लोक अवतीभोवती असले तर मग सापांची जरुरी नाही. सापांचे काम दंश करणे, डंख मारणे, किंवा विष पसरविणे हे सर्व दुर्जन करु शकतात; किंबहुना सापांपेक्षाही अधिक कौशल्याने ! या ओळीच्या उत्तरार्धात निर्दोष अशा विद्येचा गौरव करताना म्हटले; ती जर माणसाजवळ असेल तर मग पैशाची परवा करण्याचे कारण नाही; नुसत्या संपत्तीने जे होणार नाहीं ते विद्येच्या जोरावर होऊशकेल. याच्या पुढचा विचार हा खरं म्हणजे भर्तृहरीने मारलेला षट्कार म्हटला पाहिजे. वाईटा बद्दल लाज वाटणे; निंद्य काम करण्याची शरम वाटणे हा अभिजात गुण अंगी असेल तर मग इतर भूषणे म्हणजे अलंकार नसले तरी चालेल. त्यांचा काहीच उपयोग नाहीं. वाईट काम करण्याची लाज वाटणे हा सुसंस्कृतपणाचा खरा पुरावा आहे; इतर अलंकारांची जरूरच नाही. शेवटच्या भागात राजा भर्तृहरी म्हणतो सुकवित्व असले, तर राज्येन किम् म्हणजे राज्याची काय मातब्बरी ! असे कवित्वाला राजत्वापेक्षाही श्रेष्ठ मानणारे भर्तृहरी सारखे राजे होऊन गेले. आणि त्यांनी आपला अनुभव नीतिशतकाच्या रुपाने शब्दात मांडला हे संस्कृतचे भाग्यच नव्हे का ?

५) या भर्तृहरीनेच महात्म्यांचे स्वभावदत्त गुण या श्लोकात सांगून टाकले. महात्म्यांच्या अंगी आपत्तीत त्या सहन करण्याचे सामर्थ्य(धैर्य) असते. अभ्युदयात म्हणजे वैभवातही इतरांच्या प्रमादांकडे क्षमाशीलतेने बघण्याची प्रवृत्ती असते. सभात वाणीचे कौशल्य असते; त्याच्या जोरावर त्यांना सभा जिंकता येते. युद्धाच्या प्रसंगात त्यांच्या अंगाचा पराक्रम उठून दिसतो तर त्यांना यश प्राप्त करून घेण्याची आवड असते आणि ज्ञानाबद्दल(श्रुतींबद्दल) उत्कट आस्था असते; वस्तुतः ज्ञान प्राप्त करून घेण्याचे व्यसनच त्यांना जडलेले असते. या सर्व गोष्टी त्यांच्याजवळ मुळातच असल्यामुळे त्यांना त्या दाखवाव्या लागत नाहीत किंवा त्यांची उसनवारी करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणूनच त्यासाठी भर्तृहरीने 'प्रकृतिसिद्धमिदं' ला एकवचनी शब्द वामनपंडितांसारख्या व्युत्पन्न व्यक्तीने 'नीतिशतकाचे' मराठीत भाषांतर करून मराठी भाषिकांवर खरोखर फार उपकार केले.

• • •

# साने गुरुजींनी केलेली भाषांतरे शोधाची पार्श्वभूमी

प्रा. प्रदीप कर्णिक

'साने गुरुजींनी केलेली भाषांतरे' या विषयाचा शोध मी दोन अंगाने घेत होतो. एक गुरुजींच्या भाषांतरित साहित्याची सूची मिळवणे. दोन त्यांच्या भाषांतरित साहित्याचा कोणी आढावा घेतला असल्यास तो मिळवणे. दोन्ही मार्गावर मला प्रचंड निराशा पदरी पडली. साने गुरुजींच्या साहित्याची प्रसिद्ध सूची दोन मला सापडल्या. एक श्री. गो. रा. परांजपे यांनी तयार केलेली. 'साहित्य सहकार' च्या १९५२ च्या अंकात दोन भागात आली आहे. पैकी पहिल्या भागात गुरुजींवरील मृत्यूलेख, कविता व इतर लेख दिले आहेत, तर दुसऱ्या भागात गुरुजींच्या साहित्याची यादी दिली आहे. त्यात अनुवादित ग्रंथांची वेगळे नोंद नाही व तसा उल्लेखही नाही. दुसरी सूची सापडली ती राजा मंगळवेढेकर यांच्या 'साने गुरुजींची जीवन गाथा' या पुस्तकात. या यादीत गुरुजींच्या १४ पुस्तकांची नोंद 'अनुवादित' या शीर्षकाखाली केली आहे. गुरुजींच्या पुस्तकाच्या शीर्षकाशिवाय अन्य माहिती त्या सूचीत सापडत नाही. हे ग्रंथ केव्हा प्रकाशित झाले, त्यांचे मूळ लेखक, मूळ पुस्तकांची शीर्षके , प्रकाशक काहीच न दिल्याने अडचण असली तरी शोधाची दिशा सापडते. ही अनुवादित पुस्तकं शोधून काढली की काम झालं असं मला वाटलं पण पूर्वी काही गुरुजींच्या अनुवादित कथा वाचल्याचे स्मरत होते. त्यांचा उल्लेख या यादीत दिसत नव्हता. सर्व वैचारिक वाटावित अशी ती पुस्तकं होती. गुरुजींनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध या वाङ्मय प्रकारात भरपूर लेखन केलं असल्याने, त्या त्या प्रकारात त्यांनी कोणते अनुवाद केले याचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरले.

त्यासाठी मी गुरुजींच्या अनुवादित साहित्यावर कोणी लेखन केलं आहे काय याचा शोध घेऊ लागलो, पण तसं लेखन कोणी केलेलं नाही. म्हणून 'व्यक्ती आणि वाङ्मय' अशा ग्रंथाकडे वळलो. त्यात १९४९ साली प्रकाशित झालेला एक ग्रंथ मिळाला. त्यात गुरुजींच्या साहित्यावर वेगवेगळ्या अभ्यासकांचे लेख आहेत, पण स्वतंत्रपणे अनुवादावर लेख दिलेला नाही. १९९३ साली श्री.वि. गंधे यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे, पण ते मला उपलब्ध होऊ शकले नाही. रा.गो. प्रभुणे यांनी गुरुजींच्या साहित्याची शैक्षणिक चिकित्सा करणारे पुस्तक लिहिलं आहे, पण त्यात मंगळवेढेकरांच्या पुस्तकातील अनुवादित पुस्तकांची नावं जशीच्या तशी दिली आहेत. त्या अंगाने काहीच लिहिलेले नाही. हे मी मुद्दाम मांडत आहे. कारण अनुवादित साहित्याची चिकित्सा तर सोडूनच द्या, पण साधी यादीही आज उपलब्ध नाही, हे जाणकारांच्या नजरेस आणून द्यावे. गुरुजींच्या अनुवादित साहित्याचा विचार इतकी वर्षे बाजूला का सारला असेल याचा शोध मला महत्वाचा वाटतो, पण तो आजचा विषय नाही.

आता शोधाचा एक मार्ग सोपा वाटत होता, तो म्हणजे गुरुजींची चरित्रे वाचणे. मी दिशा तिकडे वळवली आणि मंगळवेढेकरांच्या पुस्तकातून काही संदर्भ सापडत गेले त्याचा धागा पकडून इतरही संदर्भ मिळत गेले. हा शोध चालू असताना प्रा. नरहर कुरुंदकरांचा 'साधने'त आलेला लेख वाचनात आला, त्यात अनवादाविषयी चांगले भाष्य सापडले. १९४३ साली प्रकाशित झालेल्या 'साने गुरुजी व्यक्ती आणि वाङ्मय' या पुस्तकात अनुवादित साहित्याविषयी त्रोटक स्वरूपात विवेचन आले आहे. इतकं होत असतानाच दापोली येथे झालेल्या एका परिसंवादात प्रा. म.द. हातकणंगलेकर यांनी 'साने गुरुजींची भाषांतरे' असा एक निबंध सादर केला हे समजले. तो मला माझे स्नेही जीवराज सावंत यांनी मिळवून दिला. या सर्व लेखनाचे संदर्भ विवेचनात पुढे आवश्यक तिथे येतीलच !

सानेगुरुजींची अंदाजे १२४ तरी पुस्तकं प्रकाशित झाली असतील. त्यात अनुवादित साहित्याचा पसारा असा दिसून येतो : कादंबरी, नाटक, लघुकथा, बालवाङ्मय,

कविता, निबंध अशा प्रत्येक वाङ्मयप्रकारात गुरुजींनी अनुवाद केले असून त्यातील बराच भाग पुस्तक रूपाने प्रसिद्ध झालेला असला तरी अप्रकाशित, अपूर्ण प्रकल्प, सोडून दिलेली कामं, असंग्रहित अनुवादित साहित्य भरपूर प्रमाणात दिसून येतं. या शोधाला एक मर्यादा आहे, ती इथे नमूद करून ठेवायला हवी. गुरुजींनी 'छात्रालय' हस्तलिखित दैनिक, 'विद्यार्थी' मासिक, 'कॉंग्रेस' साप्ताहिक, 'कर्तव्य' सांज दैनिक आणि 'साधना' साप्ताहिक चालवलं त्यात अनेक प्रकारचं अनुवादित साहित्य प्रकाशित केल्याचे उल्लेख सापडतात, पण या नियतकालिकांच्या फाईली मला तपासणे शक्य झाले नाही. त्यामुळे या अंकांमधील सर्वच अनुवादित साहित्य यात येऊ शकलेलं नाही. तसेच गुरुजींनी 'प्रदीप', 'विसावा' यासारख्या नियतकालिकासाठीही लेखन केलं आहे, तेही अंक मी पाहिलेले नाहीत.

**गुरुजींचे अनुवादित साहित्य : एक आढावा**

गुरुजींच्या अनुवादाचा पहिला दाखला सापडतो, तो गुरुजी शाळेत शिक्षक म्हणून कार्य करताना. शाळेत असताना 'छात्रालय' दैनिक चालवले होते. १९ जुलै १९२७ रोजी या दैनिकाचा पहिला अंक निघाला. या अंकामधून त्यांनी कधी टॉलस्टॉयच्या गोष्टी दिल्या, तर कधी रवींद्रनाथ, इकबाल यांच्या कवितांचे अनुवाद दिले. तर केव्हा केव्हा व्हिटमन, गटे, बायरन, शेले यांच्या कवितांचे सहज सुंदर अनुवाद मुलांसाठी करून दिले. हे दैनिक त्यांनी तीन वर्षे चालवले. गुरुजींची ही धडपड पाहून शाळेच्या मुख्याध्यापकांनी आणि इतर सहकाऱ्यांनी 'विद्यार्थी' नावाचे मासिक सुरु करायचे ठरवले. या 'विद्यार्थी' मासिकात आलेले त्यांचे काही लेखन 'गोडनिबंध' भाग २ मध्ये सापडते. यात सुंदर कवितांचे गद्य अनुवाद जसे आहेत, तसेच देशभक्ती नावाचा जो निबंध आहे तो तत्त्वज्ञान मंदिराचे संचालक प्रा. जी.आर. मलकानी यांनी विद्यार्थी मासिकासाठी लिहून दिलेल्या इंग्रजी निबंधाचा अनुवाद आहे. सुंदर कवितांच्या गद्यानुवादामध्ये एका इटालियन कवीच्या दोन कवितांचे अनुवाद आहे. गुरुजी नेहमी 'यंग इंडियाचे' वाचन निष्ठेने करीत असत. यातील विचारही ते दैनिकातून अनुवादाच्या रुपाने मुलांसाठी खास सादर करीत असत. या सर्व अनुवादाचे स्वरूप स्फुट अनुवाद म्हणूनच आहे.

पुढे गुरुजींनी शाळा सोडली आणि ते सक्रीय कार्यकर्ते बनले. धुळ्याच्या सत्याग्रहात त्यांना पकडण्यात आले आणि १७ मे १९३० पासून त्यांचा पहिला कारावास सुरू झाला. धुळ्याच्या तुरुंगात ते जवळजवळ अडीच महिने होते. या कारावासात त्यांनी भरपूर लेखन केले. कविता, नाटक, निबंध असे त्याचे स्वरूप होते. अनुवाद केल्याचे उल्लेख सापडत नाहीत. नंतर त्रिचनापल्लीच्या सेंट्रल जेलमध्ये असताना त्यांना दाक्षिणात्य समविचारी कैद्यांचा सहवास लाभला. त्यातील एका मित्राने तामिळ भाषेतील गोष्ट त्यांना सांगितली, ती त्यांनी स्वतःच्या शब्दात लिहिली. 'बेबी सरोजा' ही गोष्ट. व्हिक्टर ह्यूगो या फ्रेंच कादंबरीकाराच्या 'ला मिझरेबल' वरून त्यांनी 'दुःखी' ही गोष्ट अनुवादित केली ती याच जेल मध्ये. या कारावासातला महत्त्वाचा अनुवाद म्हणजे तिरुवल्लुवर या तामिळ पंडिताच्या 'कुरल' या ग्रंथाचा अनुवाद. एस.एस.अय्यर यांनी या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद केला होता. त्या इंग्रजी पुस्तकाचा त्यांनी अनुवाद केला. हा अनुवाद पुढे १९४८ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. आंतरभारतीची कल्पना त्यांना सुचलीही इथेच. प्रतापचंद्र मुझुमदार यांच्या Hearts beat या ग्रंथाचे 'हृदयाचे बोल' असे भाषांतर केले. याचे पुढे पुस्तकही निघाले नाही व ते हस्तलिखितही उपलब्ध नाही. या अनुवादावरबरोबर त्यांनी 'ॲमिल' च्या 'ॲमिल्स जर्नल' चे 'चिन्तनिका' या नावाने भाषांतर केले. हे काहीच पृष्ठांचे झाले होते, पुढे ते त्यांनी पूर्ण केले तरी त्याचा खंड १ ला १९४७ साली रा.ज. देशमुखांनी प्रसिद्ध केला. त्यांना या तुरुंगातून २३ मार्च १९३१ रोजी रोजी सोडण्यात आले.

पुन्हा गुरुजींना शिक्षा झाली आणि ते धुळे तुरुंगात आले. याच तुरुंगात विनोबा होते. विनोबांची गीताप्रवचने त्यांनी उतरवून घेतली ती इथेच. पुढे ते नासिकच्या तुरुंगात आले. इथेच त्यांनी 'श्यामची आई' चे लेखन केले व त्याच वहीत भगिनी निवेदिता यांच्या Religion & Dharma या नावाखाली प्रसिद्ध झालेल्या काही निबंधांचे अनुवाद केले. पुढे हा अनुवाद 'राष्ट्रीय हिंदुधर्म' या शीर्षकाने १९४० साली प्रकाशितही झाला. रवींद्रनाथांचे 'साधना' हे इंग्रजी पुस्तक

ते काही मित्रांजवळ वाचीत असत, त्यावेळी एका कैद्याने विनोबांना सांगितली की, 'याचा अनुवाद करा' विनोबा म्हणाले, ''हे गुरुजींचे काम आहे' त्यांनी या 'साधना' पुस्तकाचा अनुवाद केला. हा अनुवाद गुरुजींनी 'साधना' साप्ताहिकाच्या २८मे १९४९ ते २४ सप्टेंबर १९४९ या काळातील अंकात क्रमशः प्रसिद्ध केला. याचे पुस्तक रवींद्रनाथांच्या शताब्दीनिमित्ताने दिवाळी १९६० मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. ११ जून १९६३ साली त्याची दुसरी आवृत्ती निघाली आणि दिवाळी १९७३ मध्ये ३री आवृत्ती प्रसिद्ध झाली. याचवेळी रवींद्रनाथांच्या 'स्वदेशी समाज' या पुस्तकाचाही अनुवाद त्यांनी केला.गुरुजींना रवींद्रनाथांचे सर्वच साहित्य मराठीत आणायचे होते. तशी त्यांनी परवानगीही घेऊन ठेवली होती. पण ते जमले नाही. याच कारावासात असताना भगिनी निवेदिता यांच्या कलेवरच्या निबंधांचेही अनुवाद त्यांनी केले. ते 'कला आणि इतर निबंध' या नावाने १९४२ मध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित झाले व १९६९ मध्ये त्याचे पुनर्मुद्रण मोघे प्रकाशनाने केले. याच काळात त्यांनी एका नाटकाचाही अनुवाद केला. मॉरिस मॅटर्लिंक या लेखकाच्या नाटकाचा 'निळा पक्षी' म्हणून अनुवाद केला. किशोरीलाल मश्रूवाला यांच्या 'केळवणीना पाया' या गुजराती पुस्तकाचा अनुवाद केला. हे पुस्तक शिक्षणशास्त्रावर आहे, तो पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाला नाही. गिजुभाई या गुजराती शिक्षकाने लिहिलेल्या पुस्तकाचे 'प्रासंगिक मनन' या नावाने गुरुजींनी अनुवाद केला होता. प्रिन्स क्रोपॉटकिन यांच्या एका छोट्या पुस्तकाचाही अनुवाद केला. मुलांना समाजवादी दृष्टी मिळावी म्हणून केलेला हा अनुवाद साधनेच्या मे १९५१ च्या चार अंकात 'युवकास नवी दृष्टी' या नावाने प्रसिद्ध झाला तरी पुस्तक रूपाने आला नसावा असे वाटते. गांधीजींच्या काही लेखांचेही अनुवाद त्यांनी इथेच केले ते पुढे १९३३ मध्ये 'खेड्यात जाऊन काय करणार ?' या नावाने पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशितही झाले.

याच काळात विश्राम, शशी व मोलकरीण या कथा लिहिल्या. या पैकी 'शशी' या कथेवर रवींद्रनाथांच्या Home Coming या गोष्टीचा प्रभाव जाणवतो. ऑक्टोबर १९३३ मध्ये त्यांची सुटका झाली. पुन्हा सत्याग्रहात भाग घेतल्याने त्यांना चाळीसगाव मध्ये अटक करण्यात आले. पुन्हा ते धुळ्याच्या तुरुंगात आले.

या चार महिन्याच्या कालावधीत त्यांनी टॉलस्टॉयच्या What is Art ? या पुस्तकाचा 'कला म्हणजे काय !' हा अनुवाद केला. What to do next या ग्रंथाचाही अनुवाद करायला घेतला पण तो कुणीतरी करत आहे म्हटल्यावर त्यांनी ते काम सोडून दिले. 'जगाच्या इतिहासा' च्या अनुवादाचे मात्र काही उल्लेख सापडत नाही.

What is Art चा अनुवाद १९४३ साली प्रसिद्ध झाला व त्याची प्रस्तावना त्यांनी १२/११/१९३५ साली लिहून ठेवली होती. हे पुस्तक जेव्हा प्रकाशित झाले त्यावेळेही गुरुजी तुरुंगात होते. ही आठ वर्षांपूर्वीची प्रस्तावना त्यांना द्यायची नव्हती. येरवडा जेलमध्ये त्यांना या पुस्तकाच्या तीन प्रती आल्यानंतर त्यांनी श्री. पी.आर.देशपांडे यांस २/११/४३ रोजी पत्र लिहिले व त्यात त्यांनी लिहिले होते की, '' ती देऊ नका म्हणून श्री. पुसाळकर यांस मी सांगितले होते, परंतु तीच प्रस्तावना दिली गेली! असो. खूप टीका होईल. होऊ दे.... '' आणि तसेच झाले १९४५ च्या 'समीक्षक' अंकात प्रा. श्री.के. क्षीरसागर यांनी लेख लिहून हल्ला चढवला. त्या पाठोपाठ २६ मे १९४५ रोजी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत प्रा.ना.सी.फडके यांनी हल्ला चढवला. पुढे काही काळ त्यावर वाद झडत राहिला.

पूर्वी करून ठेवलेला 'स्वदेशी समाज' हा रवींद्रनाथांच्या पुस्तकाचा अनुवाद त्यांनी 'कॉंग्रेस' मधून क्रमशः द्यायला सुरुवात केली. पुस्तकरूपाने हा १९४० साली प्रकाशित झाला. १९३२ साली तुरुंगात असताना रवींद्रनाथांचे Greater India हे चार निबंधांचे पुस्तक त्यांना मिळाले होते, त्याचा हा अनुवाद होता.

धुळ्याच्या तुरुंगात असताना त्यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या Kali or the Future of Civilization या ग्रंथाचा अनुवाद केला तो 'संस्कृतीचे भवितव्य' या नावाने १९४३ साली प्रकाशित झाला. याची २री आवृत्ती १९४८ साली

प्रकाशित झाली. डॉ. राधाकृष्णन यांच्या आणखी एका पुस्तकाचा त्यांनी अनुवाद केला, तो म्हणजे 'महात्मा गौतम बुद्ध' हे पुस्तक १९४४ साली प्रकाशित झाले. तसेच टेनिसनच्या 'इनॉक ऑर्डन' चे गुरुजींनी 'तीन मुले' या नावाने कादंबरीत रुपांतर केले. ही कादंबरीही १९४४ साली प्रकाशित झाली. पुढे ती संक्षिप्त रुपातही आली. याच तुरुंगवासात त्यांनी के.के. मेनन यांच्या Children of Kali या कादंबरीचा अनुवाद केला. मंगळवेढेकरांनी असं म्हटलयं की तो पुढे पुस्तक रुपाने 'कालीमातेची मुले' या नावाने आला. पण पुस्तक काढून बघितल्यावर वेगळीच माहिती हाती येते. या पुस्तकावर सह अनुवादक म्हणून डॉ. ग.ना. जोशी यांचेही नाव आहे. प्रस्तावना वाचल्यावर उलगडा होतो. मूळ कादंबरी अप्रकाशित होती. तिची टंकलिखित प्रत गुरुजींना मिळाली. तिचा अनुवाद गुरुजींनी केला. पुढे तो 'विसावा' माहिकात क्रमशः प्रसिद्ध झाला. पण गुरुजींनी २० प्रकरणांचाच अनुवाद केला होता. गुरुजींचे बंधु अप्पा यांनी जोशी यांना तो अनुवाद करायला सांगितला व तो त्यांनी केला. २१ ते ३६ इतकी प्रकरणं जोशी यांनी अनुवादित केली आहेत.

१० ऑगस्ट १९४२ ला गुरुजींना सोडले पण बाहेर ४२चं आंदोलन पेटलं होतं. पुन्हा त्यांना अटक करण्यात आलं. या कारावासात त्यांनी हेन्री थॉमस यांच्या The Story of the Human Race या पुस्तकाचा अनुवाद केला व तो १९४९ मध्ये 'मानवजातीची कथा' या नावाने प्रकाशित झाला.

तुरुंगातून लिहिलेल्या पत्रातून एका अनुवादित पुस्तकाचा तपशील सापडतो. ३/१/४४ रोजी एम.आर.देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख आहे की, ''तीर्थसलिल म्हणून एक गुजराती पुस्तक आहे. त्याचा मी अनुवाद करीत आहे. फार चांगले आहे पुस्तक. आपल्या मालेतून पुढे केव्हा तरी प्रसिद्ध होईल '' पण पुस्तक प्रकाशित झालेले दिसले नाही.

१९४५-४६ च्या बोर्डी येथील वास्तव्यात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' चा अनुवाद केला होता. १९४६ मध्ये 'ना खेद ना खंत' या नावाने त्याचे पुस्तकही आले.

मंगळवेढेकरांनी आणि प्रा. हातकणंगलेकरांनी असे लिहिले आहे की पंडित नेहरुंच्या पुस्तकाचा अनुवाद पुस्तक रुपाने आला नाही. १२/६/४९ च्या पत्रात गुरुजींनीही असे लिहिले आहे की, 'Discovery of India च्या अनुवादाचा खेळखंडोबा झाला. मी त्याची आशा सोडली आहे.'' पुण्याच्या इंटरनॅशनल बुक डेपोच्या दिक्षितांनी हा अनुवाद घेतला होता पण प्रसिद्ध केला नाही असा उल्लेख मंगळवेढेकरांनी केला आहे. पण हे पुस्तक १९७६ साली कॉन्टिनेन्टल व इंटरनॅशनल यांनी संयुक्तपणे प्रकाशित केले आहे. कदाचित मंगळवेढेकराचे पुस्तक १९७५ साली आले, त्यातील हा उल्लेख वाचून हे झाले असावे. याही पुस्तकावर गुरुजींबरोबर ना.बि. करंदीकर यांचे सहअनुवादक म्हणून नाव आहे, पण ते का आले याचा उल्लेख नाही.

शशिशेखर वेदक, राम जोशी व प्रकाशभाई मोहाडीकर ही मंडळी 'प्रदीप' नावाचे एक मासिक काढीत असत. या अंकात त्यांनी श्री. दिलीपकुमार यांच्या 'तीर्थंकर' या बंगाली पुस्तकावरुन 'बर्ट्रांड रसेल', 'महात्मा गांधी आणि कला', 'रोमा रोलाँ' इत्यादि लेखांचा अनुवाद प्रसिद्ध केला आहे. ही १९४८ नंतरची घटना असावी.

१२/६/४९ च्या गुरुजींच्या पत्रात आणखी एका पुस्तकाचा उल्लेख आहे. ''मादाम क्यूटीच्या चरित्राचा ५०० पानी केलेला अनुवाद देशमुख कंपनी छापत आहे'' हे पुस्तक मात्र पहायला मिळाले नाही.

गुरुजींचे बालवाङ्मय तपासले तर काही अनुवादांचे तपशील हाती येतात. सोराब व रुस्तुम ही कथा फिर्दोसी या फारसी महाकवीच्या 'शहानामा' वरुन केली आहे. गुरुजींनी म्हटले आहे की आर्नोल्डने या गोष्टीवर महाकाव्य लिहिले आहे ते माझ्या समोर होते. गोड गोड गोष्टी भाग ६ वा मध्ये ही कथा आहे. यातील दुसरी कथा जपानी दंत कथेवर आहे. हे भाषांतर नाही पण माझ्या भाषेत मांडले आहे असे गुरुजींनी म्हणून ठेवले आहे. या कथेचे नाव 'पाखराची गोष्ट'. 'नदी

(पान क्र. १०वर)

# गर्जा जयजयकार.....

**सौ. मंजिरी मा. दांडेकर**

कला शिक्षिका डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.), ठाणे

'He came, he saw and he conquered' हे सारे अभावितपणे 'विशाखा' हा कुसुमाग्रजांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला तेव्हा घडले. या काव्यसंग्रहात निसर्गविषयक, सामाजिक आशयाच्या, प्रेमविषयक, देवविषयक, राजकीय विषयक कविता आढळतात. कुसुमाग्रजांच्या कवितेवर सावरकरांच्या कवितेचाही संस्कार घडलेला आहे हे दोघांनी अंगिकारलेली दिव्यदाहकाची पूजा व दास्यमुक्तीसाठी स्वीकारलेली आत्मसमर्पणाची वृत्ती या साम्यातून दिसून येते. 'अनादि मी, अनंत मी, अवध्य मी मला, मारिल रिपु जगति असा कवण जन्मला' असे म्हणत बलवंतालाच आव्हान देणारी बलीची मृत्युंजयी जिद्द दोघांतही आढळते.

कुसुमाग्रजांच्या कवितेतील क्रांतीचा आविष्कार मन वेधून घेतो. देशभक्तांच्या मनातील त्वेष, चीड, निर्धार यांना कुसुमाग्रजांच्या कवितेने अत्यंत सुसंवादी रीतीने व्यक्त केलेले आहे.

'विशाखा' या काव्यसंग्रहातील आवडलेल्या अनेक कवितांत 'गर्जा जयजयकार' ला अग्रक्रम द्यावा लागेल. अन्नत्याग करून मृत्यूचा दारात पाऊल टाकताना राजबंद्यांच्या ओठावर स्फुरलेले गाणे असे स्वतः कुसुमाग्रज त्याचे वर्णन करतात. मृत्युंजयांनी उघड्या डोळ्यांनी पाहिलेला स्वतःच्या मृत्यूचा सोहळा चित्रित करणारी कविता असेच या कवितेचे वर्णन करता येईल. काळाच्या अतिभव्य रंगमंचावर दोन प्रबळ शक्तीत झडणाऱ्या अटीतटीच्या संघर्षाचे वर्णन येथे दिसते.

या कवितेतील संघर्ष पाहताना कवीने काळोखाच्या वातावरणाचा केलेला सूचक उपयोग दिसतो. हा उपयोग त्यांनी वेगळ्या तऱ्हेने केलेला दिसतो. काळोखाचा प्रत्यक्ष उल्लेख एकाच ओळीत होतो- 'सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात'-- इतरत्र मात्र तो वेगवेगळ्या प्रतिमांतून येतो. 'तडितायाते कोसळेल का तारांचा संभार' या ओळीत वीज आणि तारका, 'एकच तारा समोर आणि' - यात तारा यातून, 'रात्रीच्या गर्भात-- यात रात्रीच्या गर्भातून.

हा काळोख म्हणजे अवाढव्य साम्राज्यशाहीच्या अजस्र बळाचे प्रतीक आहे. तो तुरुंगाच्या भिंतीची आणि त्यामागील भयाण वातावरणाची आठवण करून देतो.

या कवितेतील दुसरे चित्र बलिदानाचे. यातील क्रांतिकारक छातीवर वज्राचे प्रहार झेलणार आहेत, त्यांच्या हातापायात शृंखला आहेत, त्यांची मनगटे पिचणार आहेत, पण उरातील आवेश अभंग राहणार आहे. क्रुद्ध भूक पोटात थैमान घालणार असली, आतडी कुरतडणार असली, रक्ताचे पाणी करणार असली तरी त्यांना त्याची पर्वा नाही त्यांच्या पायतळी अंगार आहे, त्यांची प्रेते सरणावर पेटल्यावर तेथूनच भावी क्रांतीचे नेते जन्माला येणार आहेत. गिधाडांनी रक्तमांस लुटावे म्हणून त्यांनी आपले ऊर मोकळे केले आहे. शरीराचा संहार करण्यासाठी मरणाला आवाहन केले आहे.

बलिदानाच्या या उल्लेखांच्या जोडीला वायूसंगे भिंत ओलांडणारे श्वास, बद्ध परिस्थितीत प्रणिपात करणारे हात इ. उल्लेख विरोधाने हृदयस्पर्शी परिणाम साधतात. या कवितेतील संघर्षाचा केंद्रबिंदू शरीर ठरतो.

यातील पहिल्या कडव्यातील संघर्ष उघडपणे पाशवी सत्तेविरुद्ध आत्मबल असा आहे. 'अदय श्रृंखला' सत्ताधाऱ्यांचे भयंकर सामर्थ्य सुचवितात आणि 'खळखळू द्या' या शब्दातून सामर्थ्याचा उन्माद दिसतो. पुढच्या ओळीत या श्रृंखलांचे उद्दाम सर्प होतात. 'मृत्यूंजय आम्ही आम्हाला कसले कारागार?' या ओळीत पुन्हा एकदा त्या आत्मबलाचा सात्त्विक विजयोन्माद प्रकट होतो. आणि राजबंदी मुक्ततेचा अनुभव घेतात, बेहोल होतात ध्येयपथावरचा प्रवास आठवतात. 'पदोपदी पसरून' अशी रचना करून कुसुमाग्रज एक सरळ प्रवाही गतीचे चित्र उभे

करतात. ही गती अविश्रांत आहे. या गतीलाच तेजाचे फूल येते. 'निखारे' आणि 'तारा' यांच्या प्रकाशाने पृथ्वी आणि आकाश व्यापून टाकणारे एक पेटलेले चित्र डोळ्यांसमोर उभे राहते अंधाराच्या विरोधाने.

हे ताण हलके करण्यासाठी त्यांना आईची आठवण होते. इथली भिंत ही त्यांच्या मनाची भिंत होते, ती ओलांडून त्यांचे श्वास आईकडे जाणार आहेत. यात कारुण्य आहे ते स्वतःला वेडी मुले संबोधतात आईपुढे ते लहान होतात श्रृंखलांचे वळ आईलाच दाखवतात.

असं असलं तरी ते दुबळ्या जीवांचे रडगाणे नाही त्यांना सहानुभूतीची अपेक्षा आहे, पण अंगिकारलेल्या मार्गाचा अनुताप नाही.

आईचे डोळे ओलावतात आणि क्रांतिकारकांच्या मनातले कढ निवतात, ते धीरोदात्त बनतात. निखाऱ्यावर पाय टाकताना 'आकाशातील तारा' पाहिला होता. आता रात्रीच्या गर्भात असलेला उद्याचा उषःकाल त्यांना जाणवतो. रात्रीच्या काळोखातला प्रवास स्वतःच्या प्रेतांच्या मशालीच्या उजेडातच होणार याची त्यांना जाणीव होते. त्यातूनच जन्माला येणाऱ्या भावी क्रांतिकारकांचे तेज त्यांना दिसते आणि आईच्या पायातल्या श्रृंखला तुटणार या आनंदात ते आहेत.

शेवटच्या कडव्याला एक दृष्यात्मक मूल्य आहे.

सगळ्या कवितेलाच एक भारलेपण आहे. मूळात या कवितेतील 'संघर्ष' हाच भव्योदात्त आशय आहे. या संघर्षातील दोन्ही पक्ष तुल्यबळ आहेत. गिधाडाचा उल्लेख असला तरी कुठेही साम्राज्यशाहीला क्षुद्रता येऊ देत नाहीत. वज्र, काली, मृत्युंजय, ओंकार इ. पौराणिक प्रतिमांचा उपयोग करून या संघर्षाला ते एक विशाल संदर्भ व नवे परिमाण प्राप्त करून देतात. कवितेतील शब्दसमरसता हाही भारलेपणाचाच भाग आहे. कधी तडितापात, प्रणिपात, ध्वज, जीवन, अर्घ्य, सुखेनैव इ. संस्कृत शब्दांमधे छाती, पोट, मनगट, कुशी, निखारे इ. प्राकृत शब्द मिसळून तर कधी अदय श्रृंखला, उद्दाम सर्प, अभंग आवेश, कृद्ध भूक बद्ध कर इ. समर्पक विशेषणांबरोबर पोलादाची तमा, मरणाचे दार तारांचा संभार, पायतळी अंगार, रात्रीचा गर्भ इ. अर्थपूर्ण प्रयोगरचना तर कधी 'प्रहार' सारख्या ठसठशीत शब्दाने शब्द समरसता निर्माण केली आहे.

या कवितेतील संघर्षाचे चित्र एकसुरी वा आक्रस्ताळी नसून पराकोटीचे तीव्र आणि त्या तीव्रतेच्या विविध रूपातून विकास पावणारे वाटते. येथे अनेक आवाज एकवटले आहेत त्यातून एक धनगंभीर सूर कवितेत निर्माण झाला आहे.

•••

(पान क्र. ८ वरून)

**साने गुरुजींनी केलेली भाषांतरे**
**शोधाची पार्श्वभूमी**

शेवटी सागराला मिळेलं ही गटेच्या 'फाउस्ट' वरून केली आहे. 'फुलांचा प्रयोग' ड्युमाच्या Black Tulips वरून तर 'मनुबाबा' जॉर्ज ईलियटच्या 'सिलास मार्नर' वरून. 'यति की पति' Cloister and Hearth या कादंबरीचा उपयोग करून केली आहे. आणि 'करुणादेवी' चित्री नाटकावरून. असे काही संदर्भ सापडले. बालवाङ्मय पूर्णपणे पहाता आले नसल्याने इतकेच उल्लेख सापडले, पण यात भर पडू शकते.

त्यांच्या 'पत्री' या काव्यसंग्रहाचाही उल्लेख करावासा वाटतो. हे नावच मुळी गुरुजींना Walt Whitman यांच्या Leaves of Grass वरून सुचले. 'तृणपर्णे' हे नाव द्यायचे असे गुरुजींनी योजले होते. आचार्य भागवतांनी असं म्हटलंय, ''अमेरिकन तृणपर्णात भारतीय भक्ती मिसळली की 'पत्री' तयार होते''.

गुरुजींच्या अनुवादित साहित्याचा स्थूलमानाने केलेले ढोबळ उल्लेख. यावर विस्ताराने लिहिणे शक्य आहे व इतकी माहिती मी जमा करून ठेवलेली आहे. पण वेळेचा विचार करून हा धावता आढावा सादर केला आहे.

•••

# लॉर्ड जॉन मॅन्थॅर्ड केन्स
# एक क्रांतीकारक अर्थशास्त्रज्ञ

प्रा. दिगंबर भिडे

'पुरवठ्यामागे मागणी, जशी सजणामागे सजणी
से ची ही वाणी, ठरली आहे आज अडाणी'

वर्षानुवर्षे से च्या बाजापेठेच्या नियमावरील अंधविश्वासावर आधारित असलेल्या सनातनवादी आर्थिक सिद्धांताला १९३० सालच्या जागतिक महामंदीने जबरदस्त धक्का दिला. पूर्ण रोजगार हा नियम आणि बेकारी हा अपवाद असे प्रतिपादन जे. बी. से या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने केले. पुरवठा आपली मागणी स्वतःच निर्माण करतो. त्यामुळे अतिरिक्त उत्पादन व मंदीची शक्यता दीर्घकाळात अजिबात नसते हाच से चा बाजारपेठेचा सिद्धांत होय.

या सिद्धांताला धक्का बसून महामंदीचे संकट निर्माण झाल्यावर जे. एम्. केन्स या ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाने महामंदीच्या कारणाचे विश्लेषण केले. 'जनरल थीअरी ऑफ एम्पलॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' या ग्रंथात त्याने नवीन रोजगार सिद्धांत मांडला. या सिद्धांताने त्याला विसाव्या शतकातील महान व प्रभावशाली अर्थशास्त्रज्ञाची बिरुदावली देऊन अँडम स्मिथ, कार्ल मार्क्स या सारख्या महान अर्थशास्त्रज्ञांच्या पंक्तीत नेऊन बसवले.

सनातनवादी रोजगार सिद्धांत दीर्घकालाशी संबंधित होता. परंतु केन्सच्या मते आपण दीर्घकालात अस्तित्वात नसतो. म्हणूनच त्याने अल्पकालात राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार ठरविणाऱ्या घटकांचे विश्लेषण केले. त्यामुळे त्याच्या सिद्धांताला संदर्भमूल्य प्राप्त झाले.

पुरवठाभिमुख सनातनवादी सिद्धांताच्या ऐवजी त्याने मागणीभिमुख सिद्धांत मांडला. प्रभावी मागणी हा त्याच्या सिद्धांताचा आरंभबिंदू आहे. प्रभावी मागणीच्या तुटवड्यामुळेच मंदीची परिस्थिती निर्माण होते. या त्याच्या विश्लेषणाने आर्थिक सिद्धांत व आर्थिक नीती यांना नवीन दिशा दिली.

उपभोगाच्या मानसशास्त्रीय नियमाच्या सहायाने त्याने से च्या सिद्धांताचे खंडन केले. उत्पन्न वाढले की उपभोग वाढतो, परंतु उपभोगातील वाढ ही उत्पन्नाच्या वाढीपेक्षा अल्प दराने होते. म्हणजेच उत्पन्न वाढीबरोबर उपभोग व बचत या दोन्हींमध्ये वाढ होते. बचत व गुंतवणूक यांचा समतोल निर्माण न झाल्याने समग्र मागणी व समग्र पुरवठा या मध्ये दरी निर्माण होते व मंदीचे सावट येते. मंदीचे हे सावट दूर करण्यासाठी खाजगी खर्चातील तूट भरून काढण्यासाठी त्याला सार्वजनिक खर्चाची जोड दिली तर मंदीचे सावट हळूहळू दूर होते. म्हणूनच सरकारने निर्हस्त क्षेपाचे धोरण न अवलंबता सक्रिय सहभागाचे धोरण अवलंबिणे आवश्यक आहे. राजकोषीय धोरणाचे अर्थव्यवस्थेतील महत्व पटवून देणारा केन्स हा पहिला अर्थशास्त्रज्ञ होय.

केन्सचा गुणक सिद्धांत हे त्याने अर्थशास्त्राला दिलेले आणखी एक महत्वाचे योगदान. अर्थव्यवस्थेत एका व्यक्तीचा अथवा क्षेत्राचा खर्च दुसऱ्या क्षेत्राला उत्पन्न पुरवितो या सामान्य निरीक्षणावर हा सिद्धांत आधारित आहे. गुंतवणुकीत जेव्हा वाढ होते तेव्हां गुंतवणूक उद्योगात रोजगार व उत्पन्न निर्माण होते. या उत्पन्नाचा काही भाग गुंतवणुक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती उपभोग्य वस्तूंवर खर्च करतात. त्यामुळे उपभोग्य वस्तूंची मागणी वाढून, उपभोग क्षेत्रात उत्पन्न वाढ होते. या वाढीव उत्पन्नाचा काही भाग उपभोग्य वस्तू क्षेत्रातील व्यक्ती इतर उपभोग्य वस्तूंवर खर्च करतात. अशा प्रकारे हे चक्र चालू राहाते व गुंतवणूकीतील अल्पशा वाढीमुळे गुणक संकल्पनेच्या आधारे पुढे आंतरराष्ट्रीय व्यापार गुणका सारख्या संकल्पना निर्माण झाल्या.

(पानक्र. १६ वर)

# मूर्तींची मापे

डॉ. र.पु.कुलकर्णी

विशिष्ट देव मूर्तींची सर्वसाधारण (Overall) मापे तालमानाप्रमाणे काय घ्यावीत ते लेखांक १ मधील तक्त्यात दिले आहे. त्याच लेखात अंगुलाचे माप ठरविण्याचे तीन प्रकार दिले आहेत. त्यातील अंगुलाचे माप मिळविण्यासाठी खाली दिलेले कोष्टक वापरतात मत्स्यपुराण, विष्णुधर्मोत्तपुराण, नारदीय संहिता, अपराजितपृच्छा तसेच रूपमजुन इत्यादी पुस्तकात हे कोष्टक दिले आहे. छपरातील छिद्रातून किंवा खिडकीच्या दारातील छिद्रातून जे सूर्यकिरण घरात येतात. त्या कवडशात धुळीचे कण इतस्ततः फिरताना दिसतात. यांना अणू किंवा परमाणू म्हणतात. लांबीचे हे सर्वात लहान, सूक्ष्म माप आहे.

**मानांगुलाचे माप देणारे कोष्टक**

| | |
|---|---|
| ८ परमाण | = १ त्रसरेणू किंवा १ रथ रेणू |
| ८ त्रसरेणू | = १ बालाग्र |
| | (लहान मुलाच्या केसाचे टोकाचे माप) |
| ८ बालाग्र | = १ लिक्षा (ऊ चे अंडे) |
| ८ लिक्षा | = १ यूका (ऊ) |
| ८ यूका | = १ यवमध्य |
| ८ यवमध्य | = १ अंगुल=१ मात्रा |
| २ अंगुले | = १ गोलक |
| १२ अंगुले | = १ वितास्ति = १ ताल |

८ यवाचे (बार्लीचे) दाणे त्यांच्या मध्याशी एकमेकाला चिकटून ठेवले म्हणजे जेवढी लांबी येते ती एक अंगुले असते.

मूर्तींच्या बाबतीत देहलब्धांगुलावरून अंगुलाचे माप ठरविले म्हणजे, वरील कोष्टकाप्रमाणे, त्याच्या एक अष्टमांशाइतकी लांबी म्हणजे यव व त्याच्याही एकअष्टमांश लांबी म्हणजे यूका. अशा रीतीने देहलब्धांगुलावरून यव व यूका ठरलेले असते. ते माप अंगुले व यवात देतात. त्यासाठी यवाचे माप माहीत असणे आवश्यक असते.

समजा विष्णूची मूर्ती घडवावयाची आहे. ही मूर्ती उत्तम दशताल मापाची असते; म्हणजे तिची उंची १२४ अंगुले असते. परंतु मूर्तींची उंची मानांगुलात नसून ती १२४ देहलब्धांगुलांची असते. मूर्तीची उंची कशी ठरवितात; ती ६० सें.मी. किंवा १२० सें.मी. किंवा आणखी निराळी हे कसे ठरवितात ? त्यासाठी भारतीय शिल्पशास्त्रात काही नियम दिले आहेत. मूर्तीची उंची ही गर्भागाराच्या रुंदीच्या किंवा खांबाच्या उंचीच्या किंवा गर्भगृहाच्या द्वाराच्या उंचीच्या प्रमाणात असते. गर्भागाराच्या प्रमाणाने मूर्तीची उंची ठरवितात त्यामुळे गर्भगृह लहान व मूर्ती खूप उंच किंवा गर्भगृह खूप मोठे व मूर्ती त्यामानाने फार लहान असा अनवस्था प्रसंग येत नाही. अधिष्ठानाच्या वर पासून वरच्या प्रस्तराच्या उत्तराच्या खालपर्यंत खांबाची उंची असते. मूर्तीची उंची अशी असावी कीं गूढमंडपात उभे राहून, एवढेच काय पण मंडपाच्या दरवाजाजवळ उभे राहून किंवा महाद्वारापाशी उभी राहून देखील मूर्तीचे दर्शन व्हावयास हवे. यासाठी मूर्तीची उंची व गर्भगृहाच्या दरवाजाची उंची एकमेकांशी योग्य प्रमाण असाव्यास हवे, या दृष्टिकोनातून हा नियम दिला असावा.

गर्भागाराच्या रुंदीचे नऊ विभाग करतात. प्रतिमेची उंची एका विभागातून, एक एक विभागाने वाढवून, नऊ विभागापर्यंत असते. येथे मूर्तीच्या उंचीचे नऊ प्रकार गर्भगृहाच्या रुंदीच्या मापाने होतात. याचप्रमाणे खांबाच्या उंचीचे नऊ प्रकार केले असता प्रतिमेची उंची एका


विभागापासून, एक एक विभागाने वाढवीत, नऊ विभागापर्यंत असते. मूर्तीची उंचीच्या प्रमाणांत प्रतवारी करतात.

| मूर्तीची उंची (विभागांत) | प्रत | |
|---|---|---|
| १ | अधमाधम | कनिष्ठमूर्ती |
| २ | अधम मध्यम | |
| ३ | अधमश्रेष्ठ | |
| ४ | मध्यमाधम | मध्यममूर्ती |
| ५ | मध्यम मध्यम | |
| ६ | मध्यमश्रेष्ठ | |
| ७ | श्रेष्ठाधम | श्रेष्ठमूर्ती |
| ८ | श्रेष्ठ मध्यम | |
| ९ | उत्तमोत्तम किंवा श्रेष्ठ श्रेष्ठ | |

दाराच्या उंचीचे नऊ भाग केले असता पाच भागांची प्रतिमा श्रेष्ठ प्रकारची समजतात, चार भागांची मध्यम व तीन भाग उंचीची प्रतिमा कनिष्ठ प्रकारची असते.

या नियमांमुळे मूर्तीची उंची गर्भगृहाची रुंदी किंवा उंची यांच्या प्रमाणात असते. यातही पुढे नियम दिला आहे की श्रेष्ठ देवालयात श्रेष्ठ प्रतीची मूर्ती, मध्यम प्रकारच्या मंदिरात मध्यम व कनिष्ठ प्रकारच्या देवालयांत कनिष्ठ प्रतीची मूर्ती असावी. तेव्हा टोलेजंग देवालयात भव्य मूर्ती व लहान देवालयात लहान मूर्ती असते. तंजावर येथील बृहदीश्वराच्या मंदिरातील शिवलिंग खरोखरच बृहदाकार आहे. शिवलिंग इतक्या मोठ्या आकाराचे असू शकते याची कल्पना लहान लहान ज्योतिर्लिंगे माहीत असणाऱ्या मनाला खरेच वाटत नाही. पण त्या लिंगाचा तो भव्य अकार खुद्द मंदिरही भलेमोठे व खूपच उंच असल्याने शोभून दिसते.

अशा रीतीने उंची ठरली व ती देवाच्या प्रकारानुसार किती तालाची करावयाची हे ही निश्चित झाले म्हणजे मग देहलब्धांगुलाचे तसेच यव व यूका यांचे माप काढता येते. समजा मूर्तीची उंची ६२ सें.मी. असव्यास हवी व ती उत्तम दशताल मापात करावयाची आहे तर एक अंगुल म्हणजे १/२ सें.मी. व एक यव म्हणजे १/१६ सें.मी. अशी देहलब्धांगुलाची व यवाची मापे अनुक्रमाने मिळतात.





आकृती १ : चंद्रशेखर-उत्तमदशताल
(मापे अंगुलात आहेत.)

उत्तम दशताल मूर्तीच्या निरनिराळ्या अवयवांची मापे एका तक्त्यात दिली आहेत; तसेच आकृती १ पहा. ही मापे काश्यप शिल्प, या शिल्प शास्त्राच्या ग्रंथावरून तसेच कारणागम, या आगम ग्रंथावरून दिली आहेत. निरनिराळ्या

अवयवांच्या मापात फार थोडा फरक आहे. या तक्त्यात दिलेल्या मापांवरून शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत किती सूक्ष्मपणे मापे दिलेली असतात याची कल्पना येत नाही. याची एक झलक म्हणून उत्तम दशताल मूर्तींच्या डोळ्याची मापे काय असावीत याची माहिती काश्यप शिल्प या पुस्तकातून येते.

डोळ्यावरील भुवयीची लांबी ५ अंगुली असून तिची मध्यभागी रुंदी २ यव असते. भुवयीच्या मध्यभागातून तिची टोके चंद्रकोरी प्रमाणे लहान होत गेलेली असावीत. भुवयांचा आकार धनुष्याप्रमाणे असावा. दोन भुवयांमध्ये ४ १/२ यवांचे अंतर असावे. डोळ्यातील बुबुळाचा व्यास ६ यव असावा. त्यातील लोलकाचा व्यास एक यव असावा. काळ्या वर्तुळाचा म्हणजे बुबुळाच्या आजुबाजूला असलेल्या पांढऱ्या भागाची (कवडीची) रुंदी सहा यव असावी. डोळ्यांचा आकार मत्स्याकृती, धनुष्याकृती किंवा अर्धचंद्राकृती असावा. डोळ्यांच्या आकाराला अनुसरून पांढरा भाग असावा. डोळ्याच्या कडांपाशी १/२ यव रुंदीचा लाल रंगाचा भाग असावा. डोळ्याची वरची पापणी ११/२ यव रुंदीची असून खालची पापणी तेवढ्याच मापाची असावी. त्यांची एकूण लांबी १८ यव असावी. डोळ्यांमधील अंतर १८ यव असावे. वरची पापणी व भुवयी यांच्यामधील अंतर ६१/२ यव असावे. मूर्तीची दृष्टी खाली झुकलेली असेल तर कर्त्याचा नाश होतो. दृष्टीवर गेली असेल तर ते विपत्तिकारक असते. बाजूंकडे दृष्टी असल्यास फार नाश होतो किंवा सबंध गावाची हानी होते. तेव्हां सर्व प्रयत्नांनी दृष्टी सम असावी. अशाच रीतीने कान, नाक, ओठ, वक्ष, मांड्या, पाय वगैरेंची सूक्ष्म माहिती ग्रंथांत दिलेली असते. ती तेथेच वाचावयास हवी. अशीच माहिती उत्तम दशताल ते एक ताल उंचीच्या मूर्तींची दिलेली असते.

मूर्ती घडविण्यासाठी आडवी व उभी सूत्रे सांगितली आहेत. यातील आडव्या सूत्रांची माहिती व उत्तम दशताल उंचीच्या मूर्तींच्या अवयवांची माहिती यांचे येथे वर्णन न देता शंकराच्या आसनस्थ (सुखासीन) मूर्तीची आकृती येथे दिली आहे. या आकृतीवरून (आकृती २) सूत्रांची व मूर्तीच्या अवयवांची चांगली कल्पना येऊ शकेल. या शिवाय उभ्या सूत्रांचा देखिल वापर करतात. ही एकूण नऊ सूत्रे आहेत. ती देखील आकृती २ मधे दाखविली आहेत.



आकृती २ : सुखासन मूर्ती
मूर्ती घडविण्यासाठी सूत्रे

मूर्तींच्या वर एक आडवी फळी असते, तिला 'प्रलम्बफळी' म्हणतात. तिच्यापासून उभी लंबरूप सूत्रे टाकतात. या प्रलम्बफलिकेला चार पाय असतात; त्यांची उंची मूर्तीच्या उंचीइतकी असते. ती फळी समपातळीत राहील अशा रीतीने हे चारी पाय समपातळीत असलेल्या जमिनीवर ठेवतात.

या प्रलम्बफळीपासून मूर्तीच्या पुढे, मागे व दोन्ही बाजूंना तिच्या सीमा निश्चित करणाऱ्या चार दोऱ्या टाकतात. त्यासाठी योग्य ठिकाणी प्रलम्बफळीला छिद्रे पाडून त्यातून दोऱ्या सोडतात. या शिवाय शरीराच्या मध्यभागातून जाणारे एक सूत्र टाकतात. या पाच सूत्रांना ब्रह्मसूत्रे म्हणतात. या शिवाय दोन्ही कुशींच्या सीमांवरून व चेहऱ्याच्या रुंदीच्या

दोन्ही बाजूंना प्रत्येकी दोन दोन सूत्रे वरून खाली टाकतात. असे एकंदर नऊ उभी सूत्रे टाकतात. या आडव्या व उभ्या सूत्रांचा उपयोग मूर्ती घडविताना केला जातो.

मूर्तीचे वर्णन देताना समोरचे ते मध्य सूत्र असते. त्याच्यापासून निरनिराळ्या अवयवांचे अंतर सांगतात. त्यावरून मूर्तीचे अवयव कोठे असावेत ते कळते. खाली त्याची दोन उदाहरणे दिली आहेत.

शंकराची 'वृषवाहन' या नावाची मूर्ती आहे. येथे नंदी उभा असून त्याच्या आडव्या अंगाच्या पुढ्यात शंकर उभा आहे असे दाखवितात. शंकराच्या एका हाताचा कोपरा नंदी बैलाच्या डोक्यावर ठेवलेला असतो.

ही मूर्ती वाकलेली(समभंग) किंवा बरीच वाकलेली(अतिभंग) या पैकी एका मुद्रेत दाखवितात. समभंग मुद्रेची मूर्ती असेल तर उजवा पाय सरळ उभा व डावा पाय काहीसा वाकलेला दाखवितात. समोरचे मध्यसूत्र शंकराच्या जटामुकुटाच्या वरच्या टोकापाशी त्याच्या मध्याच्या डावीकडून, कपाळाच्या मध्याच्या डावीकडून, डाव्या मांडीच्या मध्यावरून व डाव्या टाचेच्या मध्यातून जाणारे असते. अतिभंग मुद्रेत मूर्ती असेल तर मुख ते स्तन भाग हे समभंग मुद्रेतील मूर्तीप्रमाणेच समोरच्या मध्यसूत्रापासून असतात. मात्र हे मध्यसूत्र नाभीच्या डावीकडून तीन अंगुलावरून, डाव्या मांडीच्या मध्यावरून, सरळ ठेवलेल्या उजव्या पायाच्या व घोट्याच्या मध्यातून हे मध्यसूत्र जाते.

या लेखातील आकृत्या रौरवागम(भाग२) या पॉंडेचरी येथील फ्रेंच इंडॉलॉजिकल इन्स्टिट्यूटने प्रकाशित केलेल्या पुस्तकातून घेतल्या आहेत. लेखक त्याबद्दल इन्स्टिट्यूटचा आभारी आहे.

**तक्ता क्रमांक १**

**उत्तम दशताल मान**

| अवयवांचे नांव | काश्यपशिल्पा प्रमाणे मापे अ-यव | कारणागमा प्रमाणे मापे अ-यव |
|---|---|---|
| उंचीचे माप | | |
| पगडी किंवा शिरोभी उंची | १-३ | १-० |
| पगडी ते केसाची कडा | १-० | ३-० |
| केसाची कडा ते अक्षिसूत्र | -०- | ४-४ |
| अक्षिसूत्र ते नासाग्र | -०- | ४-४ |
| नासाग्रे ते हनुवटीची कडा | ४-३ | ४-४ |
| मानेची उंची | -०- | ४-० |
| खांदा ते छातीचा भाग | १३-३ | १३-४ |
| छातीचा मध्य ते नाभी | १३-३ | १३-४ |
| नाभि ते मेढ्रमूल | १३-३ | १३-४ |
| मेढ्रमूल ते मांडीचा शेवट | २७-० | २६-० |
| गुडघ्याची लांबी | ४-० | ४-० |
| पोटरीची लांबी | २७-० | २७-० |
| घोट्यापासून जमिनीपर्यंत | ४-० | ४-० |
| पावलाच्या सर्वांत पुढचा भाग ते टाचेच्या मागचा भाग | १७-० | -०- |
| खांदा ते कोपर | २७-० | २७-० |
| कोपराची लांबी | २-० | २-० |
| कोपर ते मनगट | २१-० | २१-० |
| मनगट ते मध्यम बोटाचे अग्र | १३-४ | १३-४ |
| रुंदीचे माप | | |
| चेहऱ्याची रुंदी | १२-४ | -०- |
| मानेची वरच्या भागाची रुंदी | ९-४ | ८-४ |
| मानेची खालच्या भागाची रुंदी | १०-० | ९-६ |
| हिक्कासूत्राजवळ खांद्यामधील अंतर | २७-० | -०- |
| बगलांमधील अंतर | २२-४ | २४-४ |
| दंडाची शेवटापाशी रुंदी | -०- | ९-२ |
| मध्यप्रदेशाची रुंदी | १९-० | १८-४ |
| नाभिपाशी रुंदी | १६-० | -०- |
| श्रोणीदेशाची रुंदी | २०-४ | -०- |
| मांडीची सुरुवातीची रुंदी | १३-६ | १३-४ |

| | | |
|---|---|---|
| मांडीची मध्याची रुंदी | १२-२ | -०- |
| मांडीच्या शेवटाची रुंदी | -०- | ९-४ |
| गुडघ्याची रुंदी | ९-६ | ८-४ |
| पोटरीची सुरुवातीची रुंदी | ८-२ | ८-१ |
| पोटरीची मध्याची रुंदी | ६-६ | -०- |
| पोटरीची शेवटाची रुंदी | ४-६ | -०- |
| घोट्याच्या हाडांची रुंदी | ५-३ | ५-० |
| टाचेची रुंदी | ४:४ | -०- |
| तळव्याची मधली रुंदी | ६-२ | ५-२ |
| चवड्याची रुंदी | ७-० | ६-० |
| आंगठ्याची लांबी | ४-२ | ४-० |
| आंगठ्याची रुंदी | २-१ | -०- |
| आंगठ्याच्या नखाची रुंदी | १-१/२ | १-२ |
| आंगठ्याच्या नखाची लांबी | -०- | १-२ |
| दुसऱ्या बोटाची लांबी | ४-३ | ४-३ |
| मधल्या बोटाची लांबी | ३-६ | ३-४ |
| त्याच्यानंतर बोटाची लांबी | ३-१ | -०- |
| करंगळीची लांबी | २-४ | -०- |
| दुसऱ्या बोटाची रुंदी | -०- | १-० |
| मधल्या बोटाची रुंदी | -०- | १-० |
| त्याच्यानंतरच्या बोटाची रुंदी | -०- | १-० |
| करंगळीची रुंदी | -०- | १-० |
| दण्डमध्यापाशी दण्डाची रुंदी | ८-३ | ८-४ |
| कोपराची रुंदी | ७-२ | ७-४ |
| कोपर ते मनगट याच्या मधल्या | | |
| भागाची रुंदी | ५-६ | ५-३ |
| मनगटाची रुंदी | ३-६ | ४-० |
| बोटे सोडून उरलेल्या तळहाताची लांबी | ७-० | ७-० |
| मधल्या बोटाची लांबी | ६-४ | ६-४ |
| अनामिकेची लांबी | ५-२ | ५-२ |
| तर्जनीची लांबी | ५-१ | ५-२ |
| करंगळीची लांबी | ४-२ | ४-१ |
| आंगठ्याची लांबी | ४-२ | ४-१ |
| आंगठ्याची मुळाजवळ रुंदी | १-२ | १-४ |
| मधल्या बोटाची मुळाजवळ रुंदी | १-१ | १-४ |
| तर्जनीची मुळाजवळ रुंदी | १-० | १-० |
| अनामिकेची मुळाजवळ रुंदी | १-० | १-० |
| करंगळीची मुळाजवळ रुंदी | ०-६ | ०-६ |

बोटांची अग्राची रुंदी मुळाच्या रुंदीपेक्षा १/१६ ने कमी असते.

•••

(पान क्र. ११ वरून)

**लॉर्ड जॉन मॅन्यॅर्ड केन्स**
**एक क्रांतीकारक अर्थशास्त्रज्ञ**

चलनाच्या कार्याबाबत देखील केन्सच्या दृष्टी कोनात क्रांतिकारकता आढळून येते. पैसा हे केवळ विनिमयाचे माध्यम नाही. वर्तमानाकाल आणि भविष्यकाल यातील दुवा हेच चलनाचे महत्व होय. मूल्यसंचयाचे साधन म्हणूनच पैशाला महत्व आहे. व्यवहार हेतू दक्षता हेतू व परिकल्पना हेतू या मानसशास्त्रीय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी माणूस जवळ पैसा बाळगतो. हीच मानवाची रोकडप्राधान्य प्रवृत्ती. परिकल्पना हेतूसाठी असलेली चलनाची मागणी अस्थिर असल्यानेच अर्थ व्यवस्थेत अनिश्चितता आणि अस्थैर्य निर्माण होते. रोकडप्राधान्य प्रवृत्तीचा व्याजाचा सिद्धांत मांडून केन्सने अर्थशास्त्रीय सिद्धांताला आणखी एक नवीन वळण दिले. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केवळ वास्तव घटकांचाच विचार केला. केन्सने चलनसंबंधी घटकांचा समावेश रोजगार सिद्धांतात केला.

गुंतवणूक फलन व भांडवलाची सीमांत कार्यक्षमता या घटकांचे ही संगतवार विश्लेषण करून गुंतवणुकीचे अर्थव्यवस्थेतील महत्व त्याने पटवून दिले.

केन्सने अर्थशास्त्राला नवीन दिशा दिल्यामुळेच शुम्पीटरने त्याचा समावेश दहा महान अर्थशास्त्रज्ञात केला आहे. केन्स हा खऱ्या अर्थाने अर्थशास्त्राचा शिल्पकार व समग्रलक्षी अर्थशास्त्रज्ञाचा जनक आहे. परंतु त्याचे अर्थशास्त्र विकसनशील देशातील समस्या सोडवण्यास असमर्थ आहे ही त्याची मोठीच मर्यादा आहे. विकसनशील देशातील आर्थिक समस्यांच्या निराकरणासाठी आपल्याला हक, अमर्त्यसेन या सारख्या अर्थशास्त्रज्ञांचाच सल्ला मानणे आवश्यक आहे. विकसनशील राष्ट्रांनी अंधपणाने केन्सप्रणीत नितीच्या अवलंब केल्यास त्यांच्या समस्या सुटण्याऐवजी नवीन समस्यांना मात्र तोंड फुटेल हे त्यांनी ध्यानात ठेवावे.

•••

# अतिरेक्यांच्या राज्यात

**गणेश अनंत खराडे**

तृतीय वर्ष (कला) जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

जेव्हा मला प्रा. दामोदर मोरे सरांनी विचारलं होतं की, 'गणेश अतिरेक्यांच्या राज्यात जातोस का?' तेव्हा माझ्या डोळ्यासमोर उभं राहिलं ते 'जम्मू कश्मीर' परंतु 'त्यांच्या राज्यात कशाला?' असा प्रश्न केला तेव्हा सरांनी उत्तर दिलं 'अतिरेक्यांना तुझं भाषण ऐकण्याची ईच्छा झाली आहे. आणि भारत सरकारने त्यांना भाषण ऐकविण्यासाठी तुझी निवड केली आहे. सरकारच्या मते तुझ्या भाषणाचा जर त्यांच्यावर प्रभाव पडला तर आपला अतिरेकीपणा सोडून भारत सरकारला शरण येतील', असं सर हसत म्हणाले मी सुद्धा सरांबरोबर हसलो. सरांना विनंती केली, 'कृपया गरीबाची चेष्टा करू नका, असं कोड्यात बोलणं सोडा. मला गोंधळायला होतंय.' तेव्हा सरांनी माझा गोंधळ दूर केला आणि सांगितलं की जम्मू येथे राष्ट्रीय स्तरावरील आंतरमहाविद्यालयीन राष्ट्रीय एकात्मता कँपचे आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी विद्यालयातून ठराविक असे विद्यार्थी मुंबई-विद्यापीठात निवडीसाठी पाठवायचे आहेत. या संदर्भातील अधिक माहिती वाय. बी. भिडे सरांकडून मिळेल. त्यांना जाऊन तू भेट.

त्वरितच मी वाय. बी. भिडे सरांना गाठलं. त्यांनी कँप संदर्भात माहिती देऊन इतर नऊ विद्यार्थ्यांच्या फॉर्म सोबत माझाही फॉर्म भरून घेतला व ते फॉर्म विद्यापीठात पाठविण्यात आले. आमच्या महाविद्यालयातून माझी निवड झाली. याचा आनंद झाला. दुसऱ्यांदा निवडीसाठी मला मुंबई विद्यापीठात बोलविण्यात आलं, त्या ठिकाणी पहिल्या फेरीत निवडलेले निवडक विद्यार्थी, विद्यार्थींनी उपस्थित होते त्या ठिकाणी आमची मुलाखत झाली. प्रत्येकाला आपआपले विचार व कार्यक्रमाविषयी योजना याचे सादरीकरण करण्याची संधीही देण्यात आली, अशा प्रकारे निवड करता करता शेवटी १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यात पाच मुली व पाच मुले असा मुंबई विद्यापीठाचा संच तयार झाला व त्यात माझा सुद्धा आंतर्भाव होताच. माझी निवड झाली आहे मी जम्मू कश्मीरला जातोय ही खबर साऱ्या मित्र वर्गात व आप्तस्वकीय यांच्यात पसरली. तेव्हा विविध सल्ले, मार्गदर्शन आपणहून लोक मला देऊ लागले. सहीसलामत जा आणि बनपीस परत ये अशा शुभेच्छाही मला देण्यात आल्या, काहींनी मी फार भाग्यवान असल्याचे मत प्रदर्शित करून जम्मू कश्मीरातील निसर्ग सौंदर्याचं मनसोक्त आनंद उपभोग असं सांगितलं तर कुणी कुणी वैष्णवदेवी मातेच दर्शनही करून ये कारण एवढ्या दूर जाऊन दर्शन न घेता परतले म्हणजेच गंगेजवळ जाऊन स्नान न करता परतण्यासारखच आहे, तेथून येताना आक्रोड, बदाम, सफरचंद घेऊन ये फार स्वस्त मिळतात, वुलनचे गरम कपडे सुद्धा स्वस्त आहेत ते ही जरूर घेऊन ये असा सल्ला दिला. तिथे प्रेम जमल्यास कश्मीरी सुंदरी सुद्धा बरोबर घेऊन ये म्हणजेच तिच्या सौंदर्यानं घर उजळून निघेल. असे कित्येक विचार जम्मूला जाण्याआधीच माझ्यापुढे प्रदर्शित झाले. म्हणतात ना 'बाजारात तुरी भट भटणीला मारी' तसं माझ्या बाबतीत होतं होत, जणू काही मी तेथे वागडायला चाललो आहे. या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करीत मी कँपकडे लक्ष केंद्रित केले. कँपच्या ठिकाणी आयोजित असणारे प्रकार उदा. फोक ग्रूपडान्स, मूक अभिनय, मोनोॲक्टींग इत्यादी इत्यादी या सर्व सकारची निवड करून त्यांचा सराव करून कँपच्या ठिकाणी सादर करण्यास आम्ही सर्व तऱ्हेने तयार झालो.

२३ डिसेंबर १९९८ उजाडली, मुंबई सेन्ट्रल वरून फिरोजपूर जनता एक्स्प्रेसने सकाळी ७.३० वाजता आमचा जम्मू-कश्मीरचा प्रवास सुरू झाला. आम्हाला पोहचवण्यास आलेल्या आमच्या आप्तस्वकीयांचा निरोप घेऊन आम्ही निघालो. ट्रेन स्टेशनमधून हळू हळू दूर दूर जाऊ लागली

आणि बाहेर पडली तसतसे आमचे आप्तस्वकीय आमच्यापासून हळू हळू दूर दूर जाऊ लागले. गाडीचाही हळू हळू वेग वाढू लागला. मग गाण्यांच्या भेड्यांना सुरूवात झाली, मधेच चित्रपटातील गीत म्हणायचो तर मधेच आमच्या समूह गीतातील गीत, असं करून स्पर्धाची तयारी एकीकडे होत होती तर दुसरी कडे मनोरंजन. गाडीतून बाहेरचं सौंदर्य अनुभवत होतो व अनोळखी रेल्वे स्थानके सुद्धा. जसजशी गाडी महाराष्ट्रातून बाहेर पडू लागली तसतसा नवनवीन राज्याचा व तेथील असणाऱ्या प्रसिद्ध गोष्टींची माहिती ही मिळत गेली. प्रवास मार्गात मोठमोठी धान्याची शेतेही लागली. विशेषतः लांबच्या लांब पसरलेल्या पिवळ्या रंगाच्या फुलांची शेते पाहून सुपरहीट सिनेमा 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' ची आठवण येत होती प्रत्येक राज्यातून गाडी जात असताना त्या राज्याची विशेषता जाणवणारी दृश्ये वातावरण, लोक, त्यांचा पोशाख या अविस्मरणीय गोष्टींचा अस्वाद घेत दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ७ पर्यंत आम्ही दिल्ली गाठली. एक दिवस दिल्लीत मुकाम करून दुसऱ्या दिवशी २ वाजता 'शालीमार' एक्सप्रेसने जम्मूला रवाना होण्यास सुरूवात झाली. जसजस जम्मू जवळ येत होत तस तसा हवेतील गारठा वाढत चालला होता. धुकं ही वातावरणात पसरलं असल्याने ट्रेन चालकाला समोरचे रूळ दिसत नसल्याने गाडीचा वेग कमी झाला होता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जम्मूत पोहचलो, त्या ठिकाणी एमीटी संस्थेची माणसं (स्वयंसेवक) आमचं स्वागत करायला उभीच होती, साऱ्यांनी हात हातात घेऊन आमच स्वागत केलं. विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या बसमधून आमच्या सामानसहित आम्हाला वसतिगृहावर पोहचवण्यात आलं. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर आमचं जेवण झालं. तेथील जेवण ही तेथील हवामानाला लायक असंच होतं. स्वादिष्ट व चमचमीत जेवण आम्हांला कँपच्या शेवटच्या दिवसापर्यंत खायला मिळालं. इतर विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांची ओळख झाली उदा. केरळ, पंजाब, राजस्थान, कलकत्ता, मणिपूर, तिबेट, बी. एच. यू. इत्यादी. त्या ठिकाणी एकूण २४ विद्यापीठांचे विद्यार्थी उपस्थित होते.

२६ डिसेंबर रोजी रात्री एवढी थंडी होती की शून्य अंक सेल्सीयस इतक तापमान होत. प्यायचं पाणी बर्फासारखं थंडगार होत तेव्हा मी मुंबई सारख्या उष्ण दमट हवामानात राहणाऱ्या आणि सदैव थंडगार पाणी पिण्यास धडपडणाऱ्या मुलांस गरम पाणी प्यावस वाटलं यात नवल नाही कारण त्या शिवाय गत्यंतरच नव्हतं, त्या ठिकाणी ती सुद्धा व्यवस्था केली असल्याने पाणी पिता आले. रात्री झोपतानाही मी माझ्या उभ्या आयुष्यात पहिल्यांदाच सात आठ एकावर एक कपडे परिधान करावे लागले होते त्यात गरम कपडे सुद्धा आलेच. शिवाय वुलनची कान टोपी, पॅण्ट, सॉक्स हातमोजे, शिवाय झोपण्यापूर्वी कोल्डक्रीम चेहऱ्याला हातापायाला लावण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. आणि अशा कडाक्याच्या थंडीत अंघोळीचा विचार सुद्धा मनात नकोसा झाला होता. एवढंच नव्हे तर अशा कडाक्याच्या थंडीत सकाळी ५.४५ वाजता तेथील स्वयंसेवक येऊन आम्हाला जागे करून पंधरा मिनिटात फ्रेश व्हायला सांगून सकाळी धावण्यासाठी न्यायचे. रोज चार ते पाच किलोमीटर धाऊन झालं की मग थोडी कसरत घेऊन शेवटी देशभक्तीपर गीत, इतर समूह गीते म्हणून घेतली जायची थोर पुढाऱ्यांचे विचार इंग्लीश व नंतर हिंदी मधून वाचून दाखविले जायचे, शेवटी राष्ट्रगीत म्हणून ८.३० ते ९.३० पर्यंत सर्व तयारी करून नाश्त्याला ९.३० वाजता हजर रहायचो. नाश्ता पोट भरेल असा असायचा व त्याच्यावरोबर गरम गरम कडक चहा. चहाने तरतरी यायची. असं नित्य ३१ डिसेंबर पर्यंत होतां, २७ डिसेंबरला सकाळी १० वाजता कँपचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. त्यासाठी दिग्गज मंडळी उपस्थित होती. उदा. गवर्नर, मुख्यमंत्री, धर्मगुरू दलाई लामा इत्यादी. सुरक्षा अतिशय कडक असल्याने घड्याळ, कॅमेरा हॉलमध्ये नेण्यास पूर्णतः बंदी असे, तपासणीही प्रत्येक विद्यार्थ्यांची कडक पणे घेतली जायची. पहिल्या दिवशी ॲमीटी ॲण्ड सोलीड्यारीटीचे अध्यक्ष विरेंद्र त्रेहान यांनी संस्थेची स्थापना का व केव्हा आणि कशी झाली हे सांगितलं. नंतर दलाई लामा याच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमाला सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी जम्मू शहरावर लेक्चर्स आयोजित करण्यात आली. त्यातून जम्मूकाश्मीर संदर्भातील इतिहास समजला. शिवाय प्रश्नमंचाचा कार्यक्रमही पार पडला. तसेच राष्ट्रीय एकात्मता या विषयावरही चर्चासत्र

आयोजित करण्यात आलं होतं व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी त्यासाठी उपस्थित होती. फोक सॉंग स्पर्धाही पार पडली. त्यातून विविध राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी त्याच्या बोलीभाषेत फोकसॉंग सादर केले त्यामुळे त्या त्या राज्याची जवळून माहिती मिळाली. शिवाय फोकडान्स, फोक नॅशनल सॉंग इत्यादीद्वारे प्रत्येक राज्याच्या संस्कृतीच्या जवळ जायला मिळालं. त्यांना जाणून घ्यायला मिळलं. इंग्रजी व हिन्दी मधून प्रत्येक कार्यक्रमातील प्रकाराची माहिती सांगण्यात येत असल्याने समजण्यास सुलभ जात होत. वाद विवाद, चर्चा, वकृत्व इत्यादी छान रंगले. एकपात्री अभिनय, पथनाट्य, पारंपारिक लढाया इत्यादींना तर खूपच दाद मिळविली. शिवाय एके दिवशी आमची सहल मानस या तलावाच्या ठिकाणी नेण्यात आली. त्या तलावाची माहिती सांगण्यात आली व अतिप्राचीन अशा महाभारताचा या तळ्याशी घनिष्ठ संबंध आहे असं सांगून महाभारतातील एका प्रसंगाची कथाही तेथील मार्गदर्शकांनी सांगितली. ते तळं जगातील सर्वात खोल तळ आहे असं सांगून त्याची खोली अजून कुणीही मापू शकला नाही असं त्या तळ्याच्या बाबतीतील विशेष असं आम्हाला सांगण्यात आला. त्या तळ्यात खूप मोठं मोठे मासे असून कुणीही त्यांना पकडू नये अशी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. तळ्यामध्ये विविध पक्षांचे आगमनही होत असतं, तेथील निसर्ग फारच सुंदर असून सांबर, हरीण अशा विविध प्राण्यांच वास्तव्य ही तेथील [illegible]

करण्यासाठी तेथील काश्मीरी मुलामुलींना काश्मीरी नृत्य सादर केलं. या नृत्याच्या जोडीला पंजाबी भांगडा, तेथील लोकगीत, वाद्य-वादन पेश करून आम्हाला मंत्रमुग्ध करून सोडलं. निसर्गाच्या सान्निध्यातच आमचं सह-भोजन देखील झालं. आम्हाला वेगवेगळं विभागून प्रत्येक मुला मुलीचे एकत्र समूह तयार करून त्यांना चिनाब, तवी, सिंध, झेलम अशा नद्यांची नावे देण्यात आली. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला वेगवेगळ्या राज्यातील आलेल्या विद्यार्थ्यांच्या आणि विद्यार्थीनींच्या संस्कृती विषयी जाणून घ्यायला मिळालं. त्यांच्याशी चांगली मैत्री करता आली. त्यांचे विचार जाणून घ्यायला मिळाले.

कॅंप संपण्याच्या आदल्या दिवशी शांती यात्रेच आयोजन करण्यात आलं. त्यामध्ये प्रत्येक राज्यांतून, प्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांनी त्याच्या राज्यांची वेशभूषा परिधान करून हातामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे झेंडे, पत्रक, प्रतीके हातामध्ये घेऊन व मुखाने राष्ट्रीय एकात्मतेचे गीत म्हणत शांती यात्रा जम्मू शहरातून ४ ते ८ किमी अंतरावरून फिरवण्यात आली. वाटेत येणाऱ्या मोठमोठ्या मंदिर, मस्जिद, चर्च, गुरूद्वारा या धर्म उपासनेच्या ठिकाणी आम्हांला नेण्यात आलं. त्या उपासनेच्या ठिकाणी जाऊन एकात्मतेसाठी प्रत्येकाने ईश्वराला प्रार्थना केली, या उपासनेच्या ठिकाणी असणाऱ्या पुजाऱ्यांनी ईश्वर एकच आहे असं सांगतांना सांगितलं की सारी माणसं ही ईश्वराची लेकरं आहेत आणि प्रत्येकांमध्ये ईश्वर आहे परंतु चेहरे वेगवेगळे आहेत कारण प्रत्येक माणसाला दुसरा माणूस ओळखता यावा म्हणून ते वेगळे आहेत. त्यांनी असंही सांगितल की,

*'मंदिर, मस्जिद, गुरूद्वारों मे बॉंट दिया भगवान को*
*धरती बॉंटी अंबर बॉंटा पर , मत बॉंटो इन्सान को।*

तेथील स्थानिक लोकांशी गप्पा मारल्या तेव्हा एक गोष्ट साऱ्यांनाच प्रकर्षाने जाणवली की त्यांना आतंकवाद नको आहे. त्यांना शांती हवी आहे, सुरक्षितता हवी आहे आणि प्रेम पाहिजे आहे. त्यांना साऱ्यांमध्ये माणुसकी पहायची आहे आणि हे सारं देण्याचं काम येणाऱ्या प्रत्येक युवापिढीला करायचं आहे आणि ते आम्ही करणार याचीही [illegible]

राष्ट्रीयता एकात्मता कॅम्पमुळे आम्हाला खूप काही शिकायला मिळालं. तेव्हा असे राष्ट्रीय एकात्मता रुजवणारे कॅंप संपूर्ण भारतभर घेण्यात आलेच पाहिजेत की जेणे करून पुढे देशांची आधार स्तंभ बनणारी युवा पीढी राष्ट्रीय एकात्मतेचीच भुकेली असेल त्यातच त्यांना कर्तव्य, कर्म, समाधान, शांती प्राप्त होते असं वाटेल. या कॅंपद्वारे प्रत्येक राज्यातील रहिवाशाला व्यवस्थितपणे जाणून घेता येईल आणि राष्ट्रीय ऐक्य टिकून राहील. अशाच कित्येक सुमंगल भावनेने आम्ही प्रेरित झालो होतो. या वातावरणात कॅंपचा शेवटचा दिवस केव्हा उजाडला हे कळलंच नाही.

एकमेकांना निरोप देण घेणं चालल होतं. पाच दिवसांचा कॅंप आम्हाला मनोरंजनाची सुरेल मैफलच वाटली

आणि त्या मैफलीच्या संदर्भात सांगायच झाल तर,

*मैफलीचा हा किनारा दो घडीचा वायदा*
*कारवा दारात आला अलविदा हो अलविदा।*

दिनांक ३१ डिसेंबर रोजी दुपारी बस द्वारे आम्ही कटराला रवाना झालो व तेथील माता वैष्णवदेवीच्या दर्शनास जाण्यास मार्गक्रमण करु लागलो, देवी मातेच्या मंदिराकडे जाण्यासाठी तीन डोंगरे चढून जायला लागत असे, आम्ही सुद्धा ते डोंगर चढायला सुरूवात केली, आमच्या ग्रुप मधील प्रत्येक जण आयुष्यात एवढा पहिल्यांदाच चालला होता. परंतु रात्रीच्या वातावरणात डोंगरातून वाट चालत चालणं ह्यामध्ये सुद्धा एक प्रकारच थ्रील होतं, बसत बसत, हसत खेळत तर कधी पाणी पीत व तोंडाने खाण्यासारख चघळत आम्ही मार्गक्रमण करीत होतो, जस जसे वर डोंगर चढत होतो तस तस डोंगरपायाशी असणाऱ्या 'कटरा' शहराच सौंदर्य नजरेत भरत होत, गार वाराही अंगाला झोंबत होता पण चालून चालून अंगामध्ये शक्ती आली होती. उष्णता निर्माण झाली होती अंगावर घातलेले स्वेटर ही आम्ही हातात काढून घेतले . मित्र मेळावा बरोबर होता तेव्हा खूप दूर चालत जायचे आहे याची भीती वाटत नव्हती. रस्त्याने चालता चालता देवीमातेचे भक्तगण ही भेटत होते. त्यांच्या मुखी देवी मातेचा जयघोष होता तर कुणी कुणी मनोमनी मातेचं नामस्मरण करीत होते, मध्येच भांगडा नृत्यातील ढोलकं वाजवणारे वादक ढोल बडवत असतांना वाटेत भेटायचे, मग आम्ही सारेजण ढोलाच्या तालात मनमुरादपणे नाचायचो. रात्रीचे १२ वाजले आणि जुनं वर्ष संपून नववर्षाचं आगमन झालं, आणि डोंगरावर फटाक्यांची आतषबाजी व्हायला सुरूवात झाली. कटराशहरातील फटाक्यांची उधळण फार आकर्षक दिसत होती. प्रत्येक जण कॅमऱ्याने त्या मनोहारी दृश्याचे छायाचित्र टिपत होते. आम्ही साऱ्यांनी देवी मातेला मनोमनी नमस्कार केला. जुन्या वर्षाला आनंदाने निरोप दिला नव्या वर्षाचं अभिनंदन केल. येणारं वर्ष साऱ्यांनाच सुख समृद्धीचे भरभराटीचे जावो ही वैष्णव मातेला प्रार्थना केली आणि मग एकमेकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि पुन्हा आपल्या मार्गाला आम्ही लागलो. रात्री २.३० वाजता देवी मातेच्या स्थानाजवळ पोहचलो. हातामध्ये पूजेचे साहित्य घेऊन दर्शनास रांग लावली रांगेत असताना आमची एवढी काही तपासणी व्हायची की त्याने अक्षरशः नाकी नऊ आले होते. अशा कित्येक प्रसंगाना सामोरं जात देवी मातेच दर्शन लाभलं. देवी मातेला प्रार्थना केली की साऱ्यांना सद्‌बुद्धी दे आपल्या आशिर्वादाचा हात माझ्या डोक्यावर सदैव राहू दे. सर्व देवदर्शनं आटपून हॉटेलात चहा, नाश्ता केला आणि पुन्हा ४ ते ५ तासाचा प्रवास उरकून डोंगरपायाशी असणाऱ्या आमच्या बसमध्ये येऊन बसलो.

सर्व मंडळी बसमध्ये आल्यानंतर आमची बस सुटण्यास अर्धा तास अवकाश असल्याचे कळलं. तेव्हा प्रत्येकान तेथे असणाऱ्या बाजारात जाऊन आपआपल्या आवडीच्या वस्तू खरेदी करण्यास सुरूवात केली. खरेदी संपल्या नंतर पुन्हा बसमध्ये येऊन विराजमान झालो आणि बस सुरू झाली तिन जम्मू रेल्वे स्टेशनाचा रस्ता पकडला. जम्मू वरून आम्ही शालीमार ट्रेन पकडून दिल्लीला आलो व तेथून फिरोजपूरजनता एक्सप्रेसने मुंबईस रवाना झालो. येताना बऱ्याच आठवणी मनामध्ये घोळत होत्या त्या आठवणींची पुनरावृत्ती मनांमध्ये एकसारखी होत असताना दादर स्टेशन कधी आलं हे कळलंच नाही.

अशी ही आमची कॅंपची आणि प्रवासाची कथा, इतकी आनंददायी उत्साही तेव्हा हा कॅंप आम्हां साऱ्यांच्याच चिरस्मरणात राहील आणि माझ्या तर निश्चितच एक अविस्मरणीय क्षण म्हणून.

•••

# आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाची समस्या
# एका वेगळ्या विषयावरील संशोधन

प्रा. मोहन पाठक

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील एक प्रपाठक प्रा. डॉ. नागेश टेकाळे गेली काही वर्षे आदिवासी विभागातील कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संदर्भात आदिवासींच्या आहारविषयक सवयींचे, आहारातील घटक पदार्थांचे संशोधन करीत आहेत. याच विषयाच्या संदर्भात आदिवासींमधील चालीरीती, समाजजीवन यांचाही त्यांचा अभ्यास चालू आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासींच्या आहारातील पालेभाज्यांमधील पोषणमूल्यांच्या अनुषंगाने दोन विद्यार्थिनी Ph.D. साठी अभ्यास करीत आहेत. सामाजिक विषय म्हणून या विषयाकडे पाहताना व्यथित होणारे संवेदनक्षम मन डॉ. टेकाळे यांच्याकडे आहे.

या विषयावरील संदर्भ पाहण्यासाठी डॉ. टेकाळे, त्यांचे विद्यार्थी वारंवार ग्रंथालयात येतात. अशा अभ्यासासाठी संदर्भ पुरविणे, संदर्भाचे संशोधन करणे हा ग्रंथपाल म्हणून आनंदाचा भाग असतो. आपल्या ग्रंथालयातील साहित्याची उपयुक्तता अशा सेवेतून वारंवार वाढत असते. हा विषय समजावून घ्यावा, 'दिशा' साठी डॉ. टेकाळे यांच्या प्रयत्नांना शब्दरूप द्यावे यासाठी हा मुलाखतीचा योग मी साधला. त्यांच्या उत्तरांतील त्यांचे अनुभव शब्दांकित करताना त्यांच्या आनुषंगिक निरीक्षणांचाही समावेश या मुलाखतीस केलेला आहे.

**प्रश्न-ठाणे जिल्हामधील वारलींमधील कुपोषण या विषयाने आपले लक्ष कसे वेधून घेतले?**

उत्तर - १९९४ साली तलासरी येथे मी आश्रमशाला पहायला गेलो होतो त्यावेळी (कै.) माधवराव काणे यांची भेट घेत, त्यांच्याशी चर्चा करीत असताना, कंदमुळे खाऊन आदिवासी आपले जीवन कंठतात यात त्यांच्या कुपोषणाचे काही कारण असावे का हा विषय चर्चेत गेला. त्यांच्या या चर्चेतून या विषयाच्या संशोधनाची प्रेरणा मला मिळाली. त्यानंतर आदिवासी पाड्यांमधून, वस्त्यांमधून फिरताना अनेक कुपोषित बालके माझ्या पाहण्यात आली. त्याच वर्षी मोखाड्याच्या आदिवासी विभागात ३५० हून अधिक मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला. या बातमीने मी बराच अस्वस्थ झालो व हे लोक खातात तरी काय याचे आहार - शास्त्रीय संशोधन करावे असे मी ठरविले.

**प्रश्न - वनस्पतिशास्त्र व आहारशास्त्र यांतील अभ्यास आपण केला आहे, करीत आहात. त्या दृष्टीने या कुपोषणामागची कोणती प्रमुख कारणे आपल्याला जाणवतात.**

उत्तर - ठाणे जिल्ह्यातील वाडा, जव्हार, मोखाडा या तालुक्यांतील आदिवासींपैकी ९०% वारली लोक आहेत. पिढ्या न् पिढ्या या लोकांत जी जीवनशैली चालू आहे. तिचा अभ्यास करता अनेक कारणांमुळे कुपोषण होते हे लक्षात येते. यातील कमालीची गरिबी हे कारण फार महत्वाचे आहे. सर्व जीवन हे वारली जंगलावर अवलंबून असतात व कर्मदारिद्री असतात. बारशापासून ते अन्त्य यात्रेपर्यंत ही जमात कर्जात बुडलेली असते. त्यामुळे कोणत्याही जाणीवांचा विकास होत नाही. त्यांच्या अन्न शिजविण्याच्या व साठविण्याच्या पद्धतीही चुकीच्या आहेत त्यामुळे अन्नातील पोषक पदार्थ नाहीसे होतात. उष्मांकांचा अयोग्य पुरवठा असल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढते. या उष्मांकांच्या प्रमाणावरच माझी एक विद्यार्थिनी संशोधन करीत आहे. त्यांच्या आहारात मांसल, स्निग्ध पदार्थ व प्रामुख्याने अ जीवनसत्वाचा मोठा अभाव असतो. पालेभाज्या हा पोषणाच्या दृष्टीने आहारामधील एक आवश्यक घटक पदार्थ आहे. पालेभाज्या यांच्या आहारात अगदी कमी असतात. दूध व दुग्धोत्पन्न पदार्थांचे आहारातील प्रमाण जवळ जवळ शून्य असते. याचे कारण मी तपासले तेव्हा असे आढळले की गाय ही या लोकांच्या

दृष्टीने देवता असते म्हणून तिचे दूध प्यायचे नाही. गाईचे दूध ते काढीत नाहीत. पाळीव प्राण्यांमधेही बैल, रेडे आदीच. गंमत म्हणजे गाईला देव मानणारा हा आदिवासी बायकोला मात्र महत्व देत नाही. बायकांना स्वतःचे व्यक्तिमत्व वगैरे तर सोडाच पण त्यांच्यावर मालकी असते. त्यांची ओळख ही 'ही रामाची,' 'ही गोंद्याची' अशी करून दिली जाते. बरे धार्मिक समजुतीप्रमाणे सणावारास किंवा ऐरवीही अन्न हे गृहप्रमुखासाठी शिजवायचे. त्यामुळे गरोदर स्त्रिया, बाळंत स्त्रिया, मुली यांच्यात कुपोषण अधिक याचबरोबर दारूचे प्रमाण जास्त असणे हेही कुपोषणामागील एक प्रमुख कारण आहे. १२ वर्षापासून पुढे स्त्री व पुरूष मोहाची दारू खूप पितात. कधी निमित्ताने तर कधी विननिमित्ताने त्यामुळे भूक मरते. योग्य आहार घेतला जात नाही.

**प्रश्न - या क्षेत्रात संशोधनासाठी गेल्यावर आपण नोंदलेली निरीक्षणे कोणती ?**

**उत्तर** - याबद्दल खूप सविस्तार बोलता येईल. पण सूत्र रूपाने सांगावयाचे झाल्यास या जमातीतील हलाखी, कुपोषण याला प्रामुख्याने कारणीभूत जर काही असेल तर स्त्रीची उपेक्षा हे होय ! या भागातील स्त्री जितकी स्वावलंबी होईल तितकी हलाखी कमी होईल. ५ वर्षाखालील लहान मुले सरसकट कुपोषित असतात. एक तर सरकारी योजनांवर अवलंबून राहणे ही वृत्ती गरिबीमुळे वाढत चालली आहे. परंतु या योजनांचा म्हणावा तसा व म्हणावा तशा प्रमाणात त्यांना लाभ होत नाही. उदाहरणार्थ अंगणवाडीत दिवसातून २ वेळा खिचडी देण्याची शासनाची योजना आहे पण बऱ्याच ठिकाणी ती ८-१५ दिवसातून एखाद्या वेळेस दिली जाते. प्रमाण कमी असते. दर्जा निकृष्ट असतो.

**प्रश्न - याला जबाबदार कोण ?**

**उत्तर** - याला आपली वृत्तीच जबाबदार आहे. तसेच शहरातील आपल्यासारख्या लोकांची उदासीन वृत्तीही प्रत्यक्षअप्रत्यक्षरीत्या जबाबदार आहेच. आंगणवाडी च्या वाटप व्यवस्थेतही सुधारणा होणे आवश्यक आहे. दिलाजाणारा Protovita शिजवून दिला गेला पाहिजे.

**प्रश्न - हा Protovita काय पदार्थ आहे ?**

**उत्तर** - आपण शिरा खातो, तसा हा पदार्थ आहे. गव्हाचे पीठ (रवा) व साखर यांचे हे मिश्रण असते. ज्या कुपोषित मुलांची पचनशक्ती दुर्बळ आहे त्यांना हा पदार्थ पचविणे जड जाते.

**प्रश्न - आदिवासी बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कसे ठरवतात ?**

**उत्तर** - याच्या १ ते ४ अशा श्रेणी आहेत. कुपोषण किती आहे त्यावरून श्रेणी ठरते. श्रेणी ४ मध्ये २०% मुले आज आहेत की ज्यांना तातडीने वैद्यकीय उपचारांची गरज आहे. या श्रेणीतील मुलांची अन्नावरील वासना संपलेली असते. त्यामुळे त्यांचे डोळे निस्तेज होतात, केस पिंगट होतात, चेहरा प्रौढ दिसतो, मेंदूवर परिणाम होतो. मुडदुसासारख्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. प्रत्येक पाड्यात किमान ५-६ मुले या श्रेणीत असलेली आढळतात. श्रेणी क्र. १ मध्ये या वस्तीतले मूल आढळत नाही. ही श्रेणी म्हणजे ICMR ने मान्यता दिलेली श्रेणी आहे. या श्रेणीत चौरस आहार घेणारी मुले असतात.

श्रेणी क्र. २ व ३ मध्ये सुमारे ८०% मुले येतात. त्यांना पूर्णतः कुपोषित म्हणता येत नाही. योग्य वेळी उपचार केल्यास कुपोषणाच्या धोक्यापासून ही मुले वाचू शकतात. जव्हारपासून २५ कि.मी. अंतरावर असणारा दाभेरी हा परिसर व आसपासचे ६ पाडे या भागात ही माझी निरीक्षणे व संशोधन चालू आहेत. तसेच सईघर व बोगदरी या दुर्गम भागातही मी काम करीत आहे.

**प्रश्न - या क्षेत्रात आपण कोणते काम केले, त्याच्या तपशील, तसेच या संदर्भात आपणास साहा करणारांची नावे सांगू शकाल ?**

**उत्तर** - प्रत्यक्षअप्रत्यक्ष मदत करणारे तुमच्यासारखे, प्रा. विद्याधर बालावलकरांसारखे अनेक मित्र आहेत. सर्वांचीच नावे आठवणे शक्य नाही. कामाबद्दल म्हणाल तर (कै.) माधवराव काण्यांच्या चर्चेतून मिळालेल्या प्रेरणेतून संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करीत आहे. श्री. मुकेश



अदिवासी पाड्याला दिलेल्या भेटीत त्यांचे प्रश्न समजावून घेताना डॉ. टेकाळे.

पंत या आपल्या विद्यार्थ्याने संशोधन करून M.Sc. ही पदवी मिळविली हे तुम्ही जाणताच. त्याच्या प्रबंधाचे पहिले प्रकरण म्हणजे या विषयाचा आवाका, संशोधनाचे महत्व व गरज स्पष्ट करुन सांगणारा, वारल्यांच्या जीवनशैलीचा वेध घेणारे उत्तम प्रकरण झाले आहे. तुम्ही ते वाचलेले आहेच.

आता विद्यापीठ अनुदान आयोगाने मला संशोधनासाठी म्हणून रु. ५४,०००/ अनुदान मिळाले आहे. दोन वर्षांसाठी मिळालेल्या या अनुदानाचा विनियोग वारलींमधील कुपोषणाचे संशोधन याच अभ्यासासाठी करावयाचा आहे. त्या दृष्टीने सौ. सुप्रिया भदाणे व कु. लक्ष्मी यांचे Ph.D.चे काम चालू आहे. विज्ञान शाखेतील संशोधन उपयोजित विषयांबाबत असेल तर त्याचा सामान्याला उपयोग होऊ शकेल. अशी माझी धारणा आहे. केवळ पदवी वा प्रबंधासाठी संशोधन करण्यात काय अर्थ?

**प्रश्न - कुपोषणाचा प्रश्न दूर करण्याच्या दृष्टीने आपण कोणत्या सूचना कराल ?**

**उत्तर** - सर्वात महत्वाची बाब म्हणजे आदिवासींच्या आहार- विषयक सवयींचा अभ्यास करता अ जीवनसत्वाचा जो अभाव आहे तो दूर केला पाहिजे. अ जीवनसत्वामुळे रोग-प्रतिकारक शक्ती वाढते. या जीवनसत्वाच्या अभावामुळे आदिवासी मुले डायरिया, मलेरिया, एनफ्लुएंझा, न्यूमोनिया इत्यादी रोगांना बळी पडतात. या रोगांचे प्रमाण ४ वर्षांखालील मुलांमध्ये अधिक आहे. अ जीवनसत्वाचा अभाव असण्याची अनेक कारणे आहेत त्यात ३ ते ४ महिने होईपर्यंतच मुलांना अंगावर पाजविले जाते. भाज्या शिजविण्याच्या पद्धतीमुळे अ जीवनसत्व निघून जाते.

**प्रश्न - महाराष्ट्रात हा कुपोषणाचा प्रश्न कोठे कोठे जाणवतो ?**

**उत्तर** - आपल्या ठाणे जिल्ह्यातील वाडा, मोखाडा, जव्हार हे तीन तालुके, त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील गडचिरोली, मेळघाट आदिवासी क्षेत्रात हा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. शासनाच्या योजना या दुर्गम भागापर्यंत पोहचत नाहीत, अन्यथा काही प्रमाणात प्रश्नाची तीव्रता कमी होईल. या क्षेत्रात NGOs सामाजिक कार्यकर्ते यांचे काही चांगले प्रयत्न चालू आहेत. परंतु शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, घातक सामाजिक रूढी या सर्वांचा प्रभाव आदिवासी जीवनावर आढळतो.

एका वेगळ्या विषयावरील उपयोजित विषयावरील संशोधन म्हणून या संशोधनाचे महत्त्व आहे.

•••

# साक्षरता अभियान

**कु. सुंगधा नारायण मुकादम**
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

*''तेजस्वी डोळे असताना वाचता येत नाही,*
*किती लाजिरवाणी गोष्ट*
*मजबूत हात असताना लिहिता येत नाही,*
*किती लाजिरवाणी गोष्ट*
*बुद्धी शाबूत असताना हिशोब जमत नाही,*
*किती लाजिरवाणी गोष्ट*
*आपण सारे साक्षर असताना निरक्षरता नष्ट होत नाही,*
*किती लाजिरवाणी गोष्ट.''*

मित्र हो ! साक्षर आणि निरक्षर हा शाब्दिक अर्थ मनात घ्या आणि मनातच कल्पना करा, जवळ-जवळ उभ्या असलेल्या दोन माणसांची. त्यांपैकी एक साक्षर तर एक निरक्षर आहे. साक्षर माणसाच्या चेहऱ्यावर विजयी भाव, वाईट परिस्थितीला तोंड देण्याची डोळ्यात चमक नि असाधारण कल्पनाशक्ती दिसून येईल. पण त्याच ठिकाणी उभ्या असलेल्या निरक्षर माणसाच्या चेहऱ्यावर मात्र पराजिताचे चिह्न, डोळ्यात निराशावादी पिवळेपणा आणि मेलेल्या इच्छाशक्तीचा भाव आढळेल. सामान्य दृष्टीने दोघेही माणसंच आहेत. पण ह्या दोन माणसांमधील फरक माझ्या अंतःकरणाला गलबलून टाकतो. मला आंतरिक वेदना सहन होत नाही. आणि त्याच वेळेला मनात प्रश्नांचे तांडवनृत्य सुरू होते. 'हे असं का होतयं ? हे सगळं कसं आणि केव्हा बदलेल ?' पण बदलायला हवं खरं. हे प्रश्न माझ्या एकटीच्या मनात न येता जनतेच्या मनात यायला हवेत. कारण ती आज निरक्षर आहे. या जनतेत पुरुष, महिला, लहान मुलं, तरुण-तरुणी सगळीजण आहेत. यासाठीच घरोघरी ज्ञानाचा दिवा लावला पाहिजे.

'' अहो, बघतायं काय ? सामील व्हा. अहो ! ऐकतायं काय ? सामील व्हा.'' '' पढ़िये और पढ़ाईये, देश को आगे बढ़ाईये ! '', ''असं एक साहस करू आपली मुंबई साक्षर करू'' इत्यादी घोषणांच्या नादात साक्षरता फेरी माझ्या वस्तीतून चालली होती. त्यासमवेत निरक्षरता नष्ट झालीच पाहिजे, या संकल्पाने साक्षरता गीत गाणारे कार्यकर्ते, पथनाट्य करणारी मंडळी यांनी असे काही वातावरण निर्माण केले होते की, मलासुद्धा या शिकवण्याच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे वाटू लागले आणि क्षणाचाही विलंब न लावता मी ही त्यात सहभागी झाले.

आजपर्यंत इतिहासातील ऐतिहासिक चळवळ वाचली होती. परंतु, साक्षरतेची सुद्धा चळवळ उभारावी आणि व्हावी असे आपल्या लोकांना वाटले, केवढी मोलाची कामगिरी त्यांनी उचलली होती. यात आपला निदान खारीचा वाटा असावा, असे वाटून मी ही त्यात सहभागी झाले.

मी साक्षरता प्रशिक्षण घेतले. प्रौढांना कसे शिकवावे, कोणते पुस्तक शिकवावे, त्यांचे मानसशास्त्र काय, केवळ शिकवणेच नाही तर काही गाणी, गोष्टी, खेळ, प्रश्न-मंजुषा याचा वापर करून, शिक्षण मनोरंजक कसे असेल हे शिकविण्यात आले.

माझी भूमिका स्पष्ट होती. परंतु साक्षरतेच्याया खेळात समोरचा आपला निरक्षर हा बुलंद खेळाडू वयाने मोठा, सर्व व्यवहार सुरळीत पार पाडणारा पण मी मात्र वयाने, बुद्धीने, कसलाही अनुभव नसलेली लहान खिलाडी होते.

परंतु संकल्प केला असेल, मनात जर ठाम निश्चय असेल तर कुठलेली काम अवघड नसते. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे' ही म्हण आठवली आणि मग काय मी ही उतरले मैदानात.

सगळीकडे चाललेल्या साक्षरता अभियानात फक्तसरकारनेच प्रत्न करावा, हा विचार चुकीचा आहे.ह्यात

(पान क्र. ३९ वर)

# धामधुमीचे दिवस .... कार्यक्रमांची रेलचेल

प्रा. मोहन पाठक

डिसेंबर महिना आला की वातावरणात नवचैतन्याचे वारे वहायला लागतात. स्नेहसंमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चा, परिसंवाद, वक्तृव स्पर्धा, विविध प्रकारचे दिवस ('डे') प्रदर्शने यामुळे महाविद्यालयीन जीवनातला कोपरा न् कोपरा झोपाळ्यावाचून झुलत असतो. वातारणात छान गुलाबी थंडी असते. शाली, स्वेटर, विंड शीटर्स यामुळे कसे छान छान वाटते. कँटीन मध्ये जायचा, मस्त चहा मारायचा व आनंदात मित्रमैत्रीणींचा घोळका करून उबदारपणा शोधायाचा अशी सकाळ एक काव्य घेऊनच उगवते.

## एकांकिका

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने यंदा 'मृगजळ' आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत भाग घ्यायचे ठरवले. संजय पवार लिखित 'एका बिळात होती' ही एकांकिा आम्ही सादर केली. या एकांकिकेची उपान्त्य फेरी पार्ले येथील दीनानाथ नाट्य गृहात एक डिसेंबर रोजी होती. विद्यार्थ्यांनी बरेच कष्ट घेऊनही अंतिम फेरी आमचे विद्यार्थी गाठू शकले नाहीत.

आजच्या जीवनातील वस्तुस्थितीचा उपहास, विडबंन करणाऱ्या या एकांकिकेचे नेपथ्य व दिग्दर्शन श्री. शिरीष लाटकर यांनी केले होते. संगीत अभिजित चव्हाण तर प्रकाश योजना श्री संतोष पवार यांची होती. आमचे जे विद्यार्थी एकांकिकेस सहभागी झाले होते त्यांची नावे - मंजुषा वाळिंबे, रेश्मा, स्वप्नील शिरसाट, विजय माने. एकांकिकेचा प्रयोग पाहण्यास विद्यार्थ्यांबरोबर प्राचार्य पाटील सर स्वतः गेले होते.

## वक्तृत्व

डिसेंबर महिन्याचा पहिला सप्ताह एड्स निर्मूलन सप्ताह ('एड्स सप्ताह' नव्हे!) म्हणून सर्वत्र पाळला जातो. या विषयाबाबत जन जागृती घडवून आणावी हा त्यामागचा उद्देश्य असतो.

या वर्षी जिल्हा सामान्य रुग्णालयाने पाच डिसेंबर रोजी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन आपल्या जोशी बेडेकर महाविद्यालयात केले होते. न्यू कळवा हायस्कूल, न्यू गर्ल्स स्कूल, जोशी बेडेकर महाविद्यालय यातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. एकूण १४ स्पर्धकांपैकी जोशी बेडेकर महाविद्यालयातील गणेश खराडे दुसऱ्या पारितोषिकाचा मानकरी ठरला. स्पर्धेत परीक्षक म्हणून मी स्वतः, डॉ. ढोक, प्रा. अनिल ढवळे, डॉ. नारुळकर यांनी काम पाहिले.

## सदाशिवराव तिनईकर व चंद्रशेखर

हे दोघेही प्रशासकीय क्षेत्रातील नामवंत अधिकारी, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक समारंभासाठी उपस्थित होते. जोशी बेडेकर महाविद्यालयचा हा समारंभ थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. मुंबई महापालिकेने माजी आयुक्त सदाशिवराव तिनईकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना श्री. तिनईकर म्हणाले, ' सॅक्रेटीसने सत्यासाठी प्राण गमावले. सत्य या मूल्याचे त्याने रक्षण केले. त्याचा आदर्श सुद्धा आजच्या पिढीने समोर ठेवला पाहिजे.' त्या करिता कुणाचेही अंधानुकरण करण्याची वृत्ती मुलांनी सोडून दिली पाहिजे.' ते पुढे म्हणाले, 'असे मूल्य जपणाऱ्या माणसांमुळेच सामाजिक पातळी उंचावत असते. त्याकरिता प्राध्यापकांनीही आपला वाटा उचलणे गरजेचे आहे. नैतिक अधःपात घडविणाऱ्या अनेक गोष्टी सतत घडत असतात. त्यांच्यापासून विद्यार्थ्यांनी सावध राहून भोवतालच्या जगापेक्षा बाहेरचे विश्व अधिक मोठे आहे, याची जाणीव ठेवावी.

ठाणे महापालिकेचे आयुक्त श्री. चंद्रशेखर समारंभास उपस्थित होते. तिनईकर ठाण्यात आल्याचे कळताच ते स्वतः त्यांना भेटण्यासाठी आले होते. विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर




माजी आयुक्त सदाशिवराव तिनईकर, डॉ. वा.ना. बेडेकर, प्रा. शकुंतला सिंग, प्रचार्य सदकशिव गोखले, श्री. करंदीकर, उपप्राचार्य बडगुजर दिसत आहेत.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य सदाशिवराव गोखले यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करताना कला क्रीडा व शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांनी वजावलेल्या कामगिरीचा अहवाल सादर केला. त्याचा उल्लेख करून डॉ.वा.ना. बेडेकर यांनी अध्यक्षीय भाषणात समाधान व्यक्त केले. टी. चंद्रशेखर व तिनईकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री. वि. करंदीकर, उपप्राचार्य बडगुजर, उपप्राचार्या सौ. शोभा दोशी अनेक प्राध्यापक, विद्यार्थी समारंभास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रा. कविता पीटर यांनी केले तर कु. शिल्पा खरे हिने आभार प्रर्दशन केले.

### प्रदर्शने

आमच्या जोशीबेडेकर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात संदर्भ ग्रंथांचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी आयोजनात सक्रीय होते. त्यांना प्राध्यापक वाय.बी. भिडे व ग्रंथपाल नारायण बारसे यांचे मार्गदर्शन लाभले होते.

या शिवाय मॅजिस्टिक प्रकाशनाचे एक प्रदर्शन आमच्या कला महाविद्यालाच्या इमारतीत झाले. यात ग्रंथविक्रीही करण्यात आली.

### नवरंग

जोशीबेडेकर महावद्यिालयाचा नवरंग हा बहुचर्चित युवकोत्सव असतो. यंदाही हा उत्सव अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. यात विविध प्रकारच्या स्पर्धा, स्टॉल्स, नाच गाणी यांची रेलचेल होती.

## परिसर वार्ता २

### जानेवारीतील उत्साहाचे वारे

जानेवारी महिना म्हणजे विद्यार्थी जीवनातील व एकूणच शैक्षणिक विश्वातील धावपळीचा, कार्यक्रमांचा आणि सरता सरता परीक्षेचे वेध लावणारा महिना असतो. आमच्या विद्याप्रसारक मंडळाच्या प्रत्येक घटक संस्थेत भरगच्च कार्यक्रम असतात. विविध मान्यवर कार्यक्रमांच्या निमित्ताने आमच्या घटक संस्थांत येतात. विद्यार्थ्यांना भेटतात, शाळा महाविद्यालय प्रगतीची पहाणी करतात. हा काळ त्या दृष्टीने घटनाप्रधानच म्हणायला हवा!

## पूर्वप्राथमिक - मराठी विभाग

११ जानेवारीरोजी पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन झाले. यावर्षी पासून प्राथमिक शाळेपासून हा विभाग स्वतंत्र करण्यात आला. विद्यालंकार सभागृहात झालेल्या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. वा.ना. बेडेकर व प्रमुख पाहुण्या म्हणून जा.ए. सोसायटीच्या आदर्श बालवाडीच्या मुख्याध्यापिका सौ. अरूंधती वाड उपस्थित होत्या.



नृत्य सादर करणारी छोटी कलाकार मंडळी

मुलांना शाळेत घातल्यावर पालकांची जबाबदारी वाढते असे सांगून 'मुलांचे लाड करा पण फाजील लाड करू नका ' असे मार्गदर्शन सौ. वाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर पारितोषिक वितरण करण्यात आले. व्यासपीठावर वि.प्र.मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि. करंदीकर, कार्यवाह श्री.अ.धो.टिल्लू, पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख वसुधा मोने, माजी मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशी, सौ. महाडिक, माध्यमिक विभागाच्या सौ. गोहाड, श्री. ल.ग. देव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख समारंभानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात छोट्या विद्यार्थ्यांचे अप्रतिम कार्यक्रम झाले. या कार्यक्रमांचे संयोजन व निवेदन सौ. शरयू गलांडे यांनी केले होते. छोट्या शिशु वर्गाचे पाच तर मोठ्या शिशुचे चार कार्यक्रम झाले. छान छान वाग, जाऊ कशी मी नोकरीला, चॉकलेटचा राजा, हाकरे होडी होडी , संत मेळा, शेतकरी नृत्य, टप-टप टिपरी या सर्व कार्यक्रमांतील निरागस बालकांचा अभिनय, पोषाख व संयोजन वाखाणण्या सारखे होते. अर्थातच हे नाच बसविण्यासाठी शिक्षिकांनी घेतलेली अपार मेहनत विशेष उल्लेखनीय आहे.

## सण हा मोठा संक्रांतीचा

हिंदु संस्कृतीचे संस्कार जपणारी, सजविणारी अशी आमची शाळा आहे. यंदा संक्रांतीचा सण छोट्या शाळेत मोठ्या उत्साहात साजरा झाला. छोट्या मुलांना सुगड्याच्या पूजेचे महत्त्व, तिळगुळाचे महत्त्व सांगितले गेले. आरोग्य आणि संस्कारासहित हा सण काय शिकवतो हे मुलांना कळावे यासाठी सुगडाची पुजाही मुलांना दाखवण्यात आली. संक्रांतीच्या गाण्यांमुळे समारंभात आणखीनच रंगत आली. छोट्या मुलींना हळदीकुंकू लावून फूल देण्यात आले. सौ. शरयू गलांडे बाईंनी स्वतः रचलेले सणाची महती सांगणारे गीत छोट्या रंगी बेरंगी कपड्यात नटलेल्या मुलांकडून म्हणून घेतले. सर्वांना अर्थातच तिळगूळ वाटण्यात आला.

## प्राथमिक विभाग (मराठी शाळा)

१२ जानेवारी रोजी मंडळाच्या प्राथमिक विभागाच्या शाळेचे स्नेहसंमेलन विद्यालंकार सभागृहात संपन्न झाले. समारंभाचे अध्यक्षस्थान माननीय डॉ. वा.ना. बेडेकर यांनी भूषविले होते तर मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील महापौर पुरस्कार विजेत्या माजी शिक्षिका सौ. आशालता महाजन या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. व्यासपीठावर श्री.श्री.वि. करंदीकर, श्री. अ.धो. टिल्लू, श्री. ल.ग. देव, श्री. दिलीप जोशी, मुख्याध्यापिका सौ. शालिनी कंटक, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अ.वि.सहस्त्रबुद्धे, सौ. शुभांगी गोहाड, माजी मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशी, सौ. महाडिक इ. मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली सूत्रसंचलन छोट्या विद्यार्थ्यांनी केले होते. सौ. कंटक बाईंनी प्रस्ताविक केले तर सौ. विजया भंडारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सौ. सुनंदा जोशी यांनी अहवालवाचन केले.

सौ. महाजन बाईंनी ''अशा छोट्या बालकांचे कार्यक्रम बसविण्यात येणाऱ्या अडचणी सांगून मार्गदर्शन मिळाले तर यांच्याकडून मोठे कलाकार समाजाला मिळतील असे ही मत मांडले.'' संध्याकाळी मुलांकडून शुभंकरोति म्हणून घेतलेच पाहिजे असा सल्ला त्यांनी पालकांना दिला.

डॉ. वा.ना. बेडेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना म्हणाले,'मुले म्हणजे देवाघरची फुले असतात. पालकांनी या फुलांचे रक्षण केले पाहिजे' पारितोषिक वितरणानंतर वैविध्यपूर्ण असे सांस्कृतिक कार्यक्रम छोट्या मुलांनी सादर केले

## आनंदीबाई जोशी इंग्रजी शाळा

आमच्या या इंग्रजी माध्यमाचे वार्षिक स्नेहसंमेलन ८,९ व १० जानेवारी रोजी इयत्तावार घेण्यात आले.

८ तारखेस ५-६ वीच्या कार्यक्रमास पालक व शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री. रमेश चाफेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. '' सद्या राजकारणात गोंधळाची परिस्थिती आपण पहातो. त्यामुळे सत्य, प्रामाणिक पणा या मूल्यांची जपणूक करण्याची गरज आहे. कारण आपली संस्कृती अतिशय श्रेष्ठ आहे'' असे त्यांनी सांगितले. या दिवशी आठ सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले गेले. त्यातून सर्कस व दिंडी या कार्यक्रमांची निवड झाली.

९ तारखेस ३ ते ५ या वेळात झालेल्या ७ वी व ८वी च्या स्नेहसंमेलनास शाळेचे हितचिंतक व पालक श्री. संजय गुमास्ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ''पारितोषिक न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता प्रयत्नशील राहिले पाहिजे'' असे मत त्यांनी आपल्या भाषणात मांडले. या दिवशीही आठ सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. त्यातून चोरी झालीच नाही व राधाकृष्ण रास या कार्यक्रमाची निवड झाली.



प्रा. कुरुप सर मार्गदर्शन करताना

रविवार दिनांक दहा जानेवारी रोजी झालेल्या कार्यक्रमात मुलुंड येथील वझे महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एम.आर. कुरुप हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी अहवाल सादर करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी बोलताना प्राचार्य कुरुप म्हणाले,'विद्यार्थ्यांनी आदर्श व्यक्ती, यश मिळविण्यासाठी कशा प्रयत्नशील असतात याकडे लक्ष देऊन त्यांचे अनुकरण केले पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर परिश्रमांना पर्याय नसतो.'



मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर अहवाल सादर करताना

माननीय डॉ.वा.ना. बेडेकर यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. या वेळी मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य व शालेय समिती सभासद उपस्थित होते.

या वेळी ९ वी १०वीच्या विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम झाले. आधी दोन दिवस झालेल्या व या दिवशी झालेल्या कार्यक्रमांतून पारितोषिकासाठी पुढील कार्यक्रम पात्र ठरले. प्रथम क्रमांक-चोरी झालीच नाही, द्वितीय क्रमांक 'प्रेयर डान्स' व तृतीय क्रमांक 'सर्कस'. पहिल्या दोन दिवशी सौ. शैला सांगोलीकर व सौ. विशाखा देशपांडे तर दि. १० रोजी श्री. भाटलेकर व श्री. मळेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**महाविद्यालायाच्या परिसरात**

डिसेंबर जानेवारी हे उत्साहाचेच दिवस असतात. आमच्या तंत्रनिकेतनच्या प्रांगणातील घडामोडींचा हा मागोवा.

कळव्याच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अभियान या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत आमच्या तंत्रनिकेतनातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यात नृत्य, नाट्य, संगीत, रेखाचित्र, रांगोळी अंताक्षरी अशा विविध स्पर्धा होत्या. त्यात पुढील विद्यार्थी विजेते ठरले.

| | |
|---|---|
| कॅरम (सिंगल्स) | अमोल धोमापूरकर |
| कॅरम (मिक्स डबल) | सचिन थोरवोले व ज्योती गवळी |
| टेबलटेनिस(डबल्स) | सौरभ प्रधान व निलेश नाईक |
| बॅडमिंटन (सिंगल्स) | ऋचा कोन्हाळे |
| रांगोळी | सचिन थोरवोले (दुसरा क्रमांक) |
| टी शर्ट पेंटिंग | रुपेश राऊत(प्रथम), |
| | प्रसन्न मयेकर(तृतीय) |
| नृत्य | जुई वकील (प्रथम) |
| | स्नेहा मराठे (तृतीय) |
| एकपात्री अभिनय | ज्योती सावंत(प्रथम) |
| | अभय भांबर्डेकर (तृतीय) |

महाविद्यालयातील सांस्कृतिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

रांगोळी स्पर्धेत सुनील जाधव व मित्रांना प्रथम क्रमांक मिळाला तर फनफेअर मधील खास पदार्थ स्पर्धेत पराग मेहेंदळे व मित्रांना प्रथम क्रमांक मिळाला. सारी क्वीन म्हणून दीप्ती साळी व टाय किंग म्हणून अमोघ गुप्ते यांची निवड झाली. तुमच्या उत्पादनाची जाहिरात या अतिशय रंगलेल्या स्पर्धेत पराग मेंहदळे व मित्रांनी बाजी मारली. नाटुकल्यांच्या स्पर्धेत सुभाष लोखंडे व मित्रमंडळाचे प्रथम

पारितोषिक मिळवले. एक मिनिट या अतिशय लोकप्रिय स्पर्धेतील वैविध्य लक्षणीय होते. अंताक्षरीच्या अंतिम स्पर्धेत अविनाश गोखले व मित्रांनी प्रथम क्रमांक मिळवला. गायन स्पर्धेसाठी सौ. वेडेकर व श्री.मुकुंद मराठे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यात मनीष गायकवाडला प्रथम क्रमांक मिळाला.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सौ.व्ही.ए.जोशी व त्यांच्या समितीने उत्तम प्रकारे केले होते. या समितीवर निशांत माल्या याने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. या दरम्यान झालेल्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन प्रा. टी.व्ही.मोहिते पाटील व त्यांच्या समितीने केले होते. विद्यार्थी प्रतिनिधी तुषार भावर होता.

महाविद्यालायाच्या क्रीडा स्पर्धांत चमकलेले विद्यार्थी असे.

बॅडमिंटन (मुले) सिंगल्स -विक्रम गवारे

बॅडमिंटन (मुले) डबल्स-विक्रम गवारे व गौरव सारस्वत

बॅडमिंटन (मुली) सिंगल्स -रश्मी शेणॉय

बॅडमिंटन (मुली) डबल्स-रश्मी शेणॉय व ऋचा कोन्हाळे

टेबल टेनीस सिंगल्स -निलेश नाईक

टेबल टेनीस डबल्स-स्मित कालवे व सौरभ प्रधान

बुद्धीबळ-विजेता-सौरभ भट

कॅरम-सिंगल्स-विशाल खंदारे

कॅरम-डबल्स-नितीन सूद व मंगेश गद्रे

क्रिकेट, कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेत अनुक्रमे FYEPS, TYCH हे संघ विजेते ठरले.

**वर्ल्ड बँक प्रकल्प समिती**

शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे, यवतमाळ, आर्वी व पेण इत्यादी संस्थांमध्ये तीन वर्षांपूर्वीच केमिकल इंजिनिअरिंग हा विभाग सुरु करण्यात आलेला आहे. या संस्थांसाठी केमिकल लॅब मध्ये लागणाऱ्या उपकरणांची खरेदी शासकीय पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी वर्ल्ड बँकने नेमलेल्या प्रकल्प समितीचे सदस्य म्हणून प्राचार्य मुजुमदार यांची तज्ज्ञ म्हणून निवड झाली आहे. उपकरण पाहणीसाठी ही समिती विविध ठिकाणांच्या तंत्रनिकेतनांना भेटी देणार आहे. प्राचार्य मुजुमदारसरांचे अभिनंदन !

**वांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

आकांक्षा ९८ हा आमच्या महाविद्यालयाचा उत्हासात साजरा झालेला युवकोत्सव. अनेक स्पर्धा, त्यात सहभागी असणारे विद्यार्थी, त्यांना मार्गदर्शन करणारे प्राध्यापक.. सर्वांच्याच दृष्टीने आनंदाचे दिवस.

आकांक्षा ९८ सुरु होण्यापूर्वी एक दिवसीय क्रीडा महोत्सव साजरा झाला. प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग, क्रीडा समितीचे प्रमुख प्रा. अशोक पाटील व त्यांच्या समितीतील अनेकांचे मार्गदर्शन लाभले होते.

आकांक्षाच्या पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कथाकथनकार श्री. शशांक रसाळ उपस्थित होते. प्राचार्य पाटील सर अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. सारंग सर, कला मंडळ प्रमुख प्रा. सौ. सुधा फाटक व्यासपीठावर उपस्थित होत्या. श्री. शशांक रसाळ यांनी महाविद्यालयातील जुन्या स्मृतींना उजाळा दिला.

आकांक्षा या युवकोत्सवात सुमारे ३५० ते ४०० विद्यार्थी सहभागी झाले होते. पिनाकी भट्टाचार्य, मृदुला सुरते, मधुरा मोडक, सागर बद्री, हेमा रामानी, कौस्तुभ राणे, अपूर्व, राजेश आदी विद्यार्थ्यांनी युवकोत्सवासाठी विशेष मेहनत घेतली. सर्व स्पर्धांसाठी कॅसिओवर अमृत महाजन, तबल्यावर मृगांक दीक्षित व अतुल दीक्षित यांनी साथ केली होती.

**वार्षिक पारितोषिक समारंभ**

या वर्षीचा विशेष म्हणजे जगद्विख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचे पिताश्री प्रा. रमेश तेंडुलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यापूर्वी महाविद्यालयाचे संयुक्त असताना प्रा. रमेश तेंडुलकर 'साहित्य सहकार' च्या कार्यक्रमासाठी १९७२ साली महाविद्यालय परिसरात आले होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. रमेश तेंडूलकर
डावीकडून -प्रा. अशोक पाटील, श्री. अ.धो.टिल्लू, प्राचार्य सी.जी. पाटील,
डॉ.वा.ना. बेडेकर, श्री.श्री.वि. करंदीकर

या समारंभाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण प्रा. सौ. सुधा फाटक यांनी केले. प्रा. सौ. उषा तांबे यांनी तेंडुलकरांचा परिचय करून दिला. प्राचार्य सी.जी. पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. या प्रसंगी बोलताना प्रा. तेंडुलकर म्हणाले, 'सचिनचे सर्व यश शंभर टक्के यश आहे. यशासाठी किंमत मोजावीच लागते. तो पारितोषिकांसाठी कधी खेळला नाही तर खेळात रंगून जाऊन खेळासाठीच खेळाला'.

या प्रसंगी त्या वेळचे महापौर राजपूत आवर्जून उपस्थित होते. या महाविद्यालयाविषयी आपल्या मनात अभिमानाची भावना असल्याचे सांगून त्यांनी महाविद्यालयास शुभेच्छा दिल्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणारे माननीय डॉ. वा.ना. बेडेकर यांचे समयोचित भाषण झाले.

यानंतर डॉ. सौ. माधुरी पेजावर व प्रा. अशोक पाटील यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे घोषित केली. समारंभास श्री. वि. करंदीकर, श्री.अ.धो.टिल्लू, श्री. दिलीप जोशी व अनेक मान्यवर, पालक, विद्यार्थी व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. सुचेता वेंडिगिरी



डॉ. सुचेता वेंडिगिरी

आमच्या महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात अगदी सुरुवाती पासून जीवशास्त्राचे अध्यापन करणाऱ्या डॉ. सौ. सुचेता प्रकाश वेंडगिरी यांनी अलिकडेच पदव्युत्तर स्तराच्या नंतर मिळविता येणारी इकॉलॉजी व इन्व्हायरॉनमेंट मधील पदविका अत्यंत उत्तम गुणांनी मिळविली. विशेष म्हणजे त्यांचा प्रबंधास ९०% गुण प्राप्त झाले.

पी.जी.डी.इ.ए. (म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इकॉलॉजी अँड एनव्हेरॉनमेंट) हा अभ्यासक्रम नवी दिल्लीची भारतीय इकॉलॉजी एनव्हेरॉनमेंट संस्था चालवते एकूण ८ प्रश्नपत्रिका, दोन वर्षात व संशोधन करून (पदव्युत्तर स्तरावरील दर्जाचे) एक प्रबंध तयार करणे असे

या परीक्षेचे स्वरूप होते. डॉ. बेंडिगिरी यांनी 'Ambient Air Quality Assesment of Selected areas in Mumbai' या विषयावर प्रबंध सादर केला. बोरिवली, दादर, परळ, चेंबुर येथील हवेच्या नमुन्यांवर आधारित असा हा अभ्यास आहे.

डॉ. बेंडिगिरी यांचा पीएचडी चा विषयही उपयोजित स्वरूपाचा व म्हणनूच महत्त्वाचा होता. त्यांनी "Diet formulation for acquarium fishes - Study of Freshwater Fishes " या विषयावर संशोधन केले होते. विशेष म्हणजे डॉ. बेंडिगिरी या आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थिनी होत.

**डॉ. स्नेहलता देशमुखांची भेट**

संक्रांतीच्या दिवशी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. सौ. स्नेहलता देशमुख आमच्या कलावाणिज्य महाविद्यालयाच्या शिक्षक मंचाच्या कार्यक्रमासाठी आल्या होत्या. शिक्षकमंचाच्या प्रा. रुपाली वाळुंजकर देशपांडे यानी प्रास्ताविक केले. प्राचार्य सदाशिवराव गोखले यांनी पुष्प गुच्छांनी मान्यवरांचे स्वागत केले. एक महिला डॉक्टर विद्यापीठाच्या कुलगुरु होतात याचा मान म्हणून त्यांनी भारतातील पहिल्या डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र डॉ. सौ. देशमुख यांना दिले.

या नंतर शिक्षकमंचातील शिक्षकांच्या या महिन्याच्या मागे पुढे असणाऱ्या शिक्षकांचा वाढदिवसाबद्दल गौरव करण्यात आले. अन्य यशाबद्दलही उल्लेख करून गौरव केला गेला.

प्रा. सौ. सिंग यांनी कुलगुरुंची ओळख करून देऊन त्यांची विचारधारा स्पष्ट केली. कुलगुरु डॉ. सौ. देशमुख यांनी शिक्षक मंचाने बनविलेल्या शिक्षकांच्या डिरेक्टरीचे प्रकाशन झाले. प्राचार्य गोखलेसरांच्या व्याख्यानानंतर बोलताना डॉ. सौ. देशमुख म्हणाल्या,'या महाविद्यालयातील वातावरण सौहार्दाचे असून हे महाविद्यालय एखादे कुटुंब जाणवावे तसे मला जाणवत आहे. केवळ इमारती बांधणे कोणालाही जमेल पण कौटुंबिक भाव निर्माण करणे, टिकवणे अवघड आहे.'' त्यांनी यावेळी विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालये विद्यापीठात सुसंवाद साधला जाण्याची गरज व्यक्त केली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणारे डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने समारोप झाला. प्रा. टोकेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

थोरले बाजीराव सभागृहात झालेल्या या समारंभास मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि. करंदीकर व कार्यवाह श्री.अ.धो.टिल्लू तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

•••




डॉ. देशमुखांचा गौरव करताना डॉ.वा.ना. बेडेकर - सोबत प्राचार्य गोखले व कार्याध्यक्ष श्री.करंदीकर

# परीक्षांचे वेध आणि कार्यक्रमांचे सातत्य

## परिसर वार्ता ३ व ४

### आनंदी बाई जोशी-पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

विशाखा देशपांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार २७ फेब्रु. ९९ रोजी सायंकाळी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाची रंगीबेरंगी उत्साही वातावरण बालकांच्या हालचालीतून सजीव होत होते. अध्यक्षस्थानी माननीय डॉ. वा. ना. बेडेकर होते. तर पारितोषिक वितरणासाठी प्रमुख अतिथी म्हणून सौ. अचला महाजन होत्या.

या विभागाच्या प्रमुख सौ. मेधना मुलगुंद यांनी प्रास्ताविकपर भाषण करुन शाळेचा अहवाल सादर केला. तसेच सौ. महाजन बाईंचा परिचयही करुन दिला. सौ. महाजन बाईंनी आपल्या भाषणात या विभागातील शिक्षिकांचे विशेष कौतुक करून पालकांनाही मोलाचे मार्गदर्शन केले. बाल कलाकाराना कवितेच्या रुपात त्यांनी आशिर्वाद दिले. समारंभाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर या प्रसंगी म्हणाले, ''अभ्यासाबरोबर क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांना महत्व असते. त्यामुळे मुलांना मी सुयश चिंतुन आशिर्वाद देतो.'' यानंतर पारितोषिके वितरित करण्यात आली.



बाहुलीचे लग्न - छोट्या शिशू मध्ये सर्वश्रेष्ठ

या नंतर सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे परीक्षक म्हणून दूरदर्शन कार्यक्रमाधिकारी शिवाजी फुलसुंदर व सरस्वती मंदिर ट्रस्टच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. रोहिणी रसाळ यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे मेघना भिडे व निनाद कुलकर्णी या छोट्या विद्यार्थ्यांनी धीट व सफाईदार पणे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात इंग्रजी स्वागत गीत, बुगी वुगी हा हिंदी गीतांच्या आधारे झालेल्या कार्यक्रम, नन्हे मुन्ने सैनिक हम, कोळी नृत्य, बाहुला बाहुलीचे लग्न, टायटॅनिक व मधुमती चित्रपटातील गीत नृत्ये सादर करण्यात आली. सर्वच कार्यक्रमांत विद्यार्थ्यांची वेशभूषा, शिस्त, उत्साह, कार्यक्रमातील तपशील जाणून सादर करण्याचे कौशल, नृत्य गीतांची कोरिओग्राफी अत्यंत वाखाणण्यासारखी होती. बाहुल बाहुलीचे लग्न व मधुमती मधील गीतावरील नृत्य चे कार्यक्रम सर्वोत्कृष्ट ठरले.

### आनंदीबाई जोशी प्राथमिक इंग्रजी शाळा

जानेवारी ७ व ८ रोजी या शाळेचे स्नेहसंमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमांतील वैशिष्ट्य म्हणजे भारतीय पारंपारिक नृत्य गायनापासून ते पाश्चात्य नृत्यापर्यंतच्या सुंदर मिलाप या संमेलनात होता.



'ऐरा गैरा नथ्थू खैरा' यातील कलाकार मार्गदर्शक शिक्षकांसह

१ली व २री च्या विभागात सौ. रश्मी शर्मा व श्री. संजय बोरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'ऐरा गैरा नथ्थू खैरा'

या नृत्याने बाजी मारली तर ३री ४थी च्या विभागातून 'पपेट शो' उत्कृष्ट ठरला. या पपेट शोमध्ये २ फुटी जिवंत ८ बाहुल्याच रंगमंचावर बालगीतावर नृत्य सादर करीत होत्या. वाचक असा हा कार्यक्रम सौ. शैला सांगोली, शेर्लीन ख्रिस्तोफर व कीर्ती कटारा यांनी बसविला होता. संमेलनातील संगीताची बाजू सौ. वीणा जोशी यांनी संभाळली होती.

संमेलनासाठी प्रमुख अतिथी म्हणून पहिली दुसरीच्या विभागास शाळेच्याच पालक डॉ. सौ. सुनीता ओक तर तिसरी चौथीच्या विभागास प्रा. सौ. प्रज्ञा कानिविंदे उपस्थित होत्या. त्यांनी यथोचित मार्गदर्शनपर भाषणे केली. तसेच कार्यक्रमांच्या परीक्षक म्हणूनही काम पाहिले.

या सर्व कार्यक्रमांना मुख्याध्यापिका बेलिंडा डिसूझा यांचे मार्गदर्शन लाभले होते.

**कला व विज्ञान प्रदर्शन**



**विद्यार्थ्यांच्या प्रयोगाची माहिती घेत असताना डॉ. वा.ना. बेडेकर**

२० फेब्रुवारी हा माननीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचा जन्मदिवस. या निमित्ताने इंग्रजी शाळेत (माध्यमिक विभाग) कला व विज्ञान प्रदर्शने भरविण्यात आली होती. या वेळी शाळेच्या रोशनी या वार्षिक अंकाचे माननीय डॉक्टरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थ्यांची विविध चित्रे, त्यांनी बनविलेल्या वस्तू यांचे देखणे प्रदर्शन शाळेच्या हॉलमध्ये भरविण्यात आलेले होते. तर प्रयोग शाळेत ५ वी ते ९ वी तील विद्यार्थी विविध वैज्ञानिक प्रयोग करून दाखवले होते. सौ. अर्पणा वरूडकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या प्रदर्शनांतील कृतींतील काही कृतींची पारितोषिकांसाठी निवड झाली.

सौ. मनाली देवधर यांनी दिलेल्या माहितीनुसार याच दिवशी ग्रंथालयातील समृध्द संग्रहाचे प्रदर्शन सौ. गोखले व श्री. संजय बोरकर यांनी भरविले होते. तसेच संगणक विभागातर्फे संगणकांच्या परिचयाचा कार्यक्रम झाला. चारही मजल्यांवर विद्यार्थ्यांनी काढलेला सुबक रांगोळ्या लक्ष आकर्षून घेत होत्या. या सर्व उपक्रमांना मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांचे मार्गदर्शन लाभले होते.

**वॉल पेंटींग**



**वॉल पेंटींगसाठी आमच्या विद्यार्थ्यांनी रंगवलेली भिंत**

२०फेब्रुवारी रोजी रोटरी क्लब ऑफ ठाणे यांनी वॉल पेंटींग स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत पर्यावरण व वन्य जीवन या विषयावर चित्रे काढून घोषवाक्ये तयार करावयाची होती. या स्पर्धेत आमच्या इंग्रजी माध्यमाचा माध्यमिक विभागाला द्वितीय क्रमांक मिळाला. विद्यार्थ्यांनी बनविलेले घोष वाक्य असे होते - ''अतिक्रमणाचा झालाय इथेही कहर , आम्हाला ही द्या एक टी चंद्रशेखर !''

**कुमार कलाकेंद्र व अन्य कला स्पर्धा**

कुमार कला केंद्र या संस्थेच्या फेब्रु. ९९ मध्ये झालेल्या ३४व्या आंतर शालेय एकांकिका स्पर्धामध्ये

विद्यार्थी व शिक्षक यांना पुढीलप्रमाणे पारितोषिके मिळाली.

**मराठी एकांकिका :-** माध्यमिक विभागाने सादर केलेल्या ''बर्थडे गिफ्ट'' या एकांकिकेस प्रथम पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट अभिनेता म्हणून साहिल पिंगळे तर उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून समृद्धी जोशी यांची निवड झाली. उत्कृष्ट शिक्षक लेखक व दिग्दर्शक हा पुरस्कार हर्षदा बोरकर यांना मिळाला.

**हिंदी एकांकिका -** ''खिडकी ना खोलना'' ही आमच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली एकांकिका प्रथम पुरस्काराची मानकरी ठरली. उत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक सायली देशपांडे हिला तर उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शकाचा पुरस्कार श्री. संजय बोरकर यांना मिळाला.

नृत्य - माध्यमिक विभागाने सादर केलेल्या 'संघर्ष नृत्यास' प्रथम क्रमांक प्राप्त झाला.



कुमार कला केंद्रात चमकलेले विद्यार्थी

इंग्रजी माध्यमातील सर्वाधिक पुरस्कार मिळविणारी शाळा असा विशेष पुरस्कारही आमच्या शाळेला मिळाला. या यशामागे श्री संजय बोरकर, सौ. वीणा जोशी, हर्षदा बोरकर, उल्का कुलकर्णी, सुरेखा लोंढे आदी शिक्षकांनी घेतलेले परिश्रम व विद्यार्थ्यांनी दाखविलेला उत्साह हे कारणीभूत होते. मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन यामुळेच हे यश आम्हाला मिळाले अशी भावना ''दिशाशी'' बोलतांना शिक्षक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

**प्राथमिक विभाग मराठी शाळा.**

डॉ. बेडेकर विद्यामंदीराच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शालीनीताई कंटक २८ फेब्रु रोजी निवृत्त झाल्या. ३३ वर्षे सेवाभावी वृत्तीने काम केल्या नंतर त्या निवृत्त होत आहेत. त्यांच्या उर्वरित आयुष्यातील इच्छा पूर्ण होवोत आणि दीर्घ आरोग्यादायी जीवन त्यांना लाभो ही दिशा तर्फे त्यांना शुभेच्छा.

श्रीमती कंटक यांच्या पदाचा भार १ मार्च ९९ पासून सौ. सुलभा दांडेकर यांनी स्वीकारला आहे. त्याच्या नेतृत्वाखाली आमच्या शाळेची वाटचाल अशीच जोमाने होत राहील हा विश्वास आहे.

**माध्यमिक विभाग मराठी शाळा**

माध्यमिक विभाग मराठी शाळेतील काही महत्त्वाच्या घडामोडी व यशाचे टप्पे पुढील प्रमाणे आहेत.

एप्रिल ९८ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत आमच्या शाळेतील कपिल एडके हा शहरी विभागात गुणवत्ता यादीमध्ये २०व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला तर ग्रामीण भागाच्या गुणवत्ता यादीत आमच्या प्रसाद पात्रे ला १८ वा क्रमांक मिळाला. याच परिक्षेत ऋता थळे ही विद्यार्थीनी ठाणे जिल्ह्यातून तृतीय क्रमांकाने तर सुदीप कामत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

शासकीय चित्रकला परीक्षा - सप्टेंबर ९८ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंटरी परीक्षेत २ विद्यार्थ्यांना 'बी' श्रेणी प्राप्त झाला तर इंटरमिडिएट ग्रेड परीक्षेत ४ विद्यार्थ्यांना 'बी' श्रेणी प्राप्त झाली.

बनश्री सामाजिक उन्नति वृक्षलागवड संस्था अहमदनगर आयोजित राज्यस्तरीय रंगभरण स्पर्धेत कु. स्मिता पाटील हिला बालनिसर्ग रत्नाकर स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तर कु. अस्मिता ताम्हनकर हिला बालनिसर्ग प्रमाणपत्र प्राप्त झाले.

'रविवारी चित्रे काढा व रंगवा' या उपक्रमांतर्गत झालेल्या चित्रकला स्पर्धेत सौरभ नार्वेकर, रिमा मेंगळे व रोहन मेंगळे यांस उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त झाली.

Save Ozone Layer पोस्टर स्पर्धेसाठी सौरभ नार्वेकर याचे चित्र दिल्लीला पाठवण्यात आले. तसेच राज्य

उत्पादन शुल्क आयोजित पोस्टर स्पर्धेत सौरभ नार्वेकर, अमर घैसास, गोविंद सावंत, भैरवी दोशी यांची चित्रे पाठवण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये चित्रकला विषयाची विशेषत: माणसांची चित्रे काढण्याची आवड निर्माण व्हावी या हेतूने Sketching Club सुरू करण्यात आला. या Club मधील विद्यार्थ्यांनी नुकताच येऊर येथे प्रत्यक्ष बाह्यचित्रणाचा अनुभव घेतला. सर्व विद्यार्थी इ. ५ वी तील होते.

मनिषानगर कळवा येथील तालुका पातळीवरील विज्ञान प्रदर्शनात गीतेश शिंदे व ओंकार जोशी यांनी 'दळणवळणाची साधने' याची प्रतिकृती मांडली होती.

हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा - कु. मनाली सत्तरकर ही विद्यार्थिनी हिंदी राष्ट्रभाषा प्रवेशिका परीक्षेत ९५% गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर उत्तीर्ण झाली.

वि.हिं.प. ठाणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या रामायण परीक्षेत नीलेश गोवेकर हा विद्यार्थी ९३% गुण मिळवून ठाणे शहरात ५व्या क्रमांकावर उत्तीर्ण झाला.

माजी विद्यार्थी कु. ललित दिलिप ताहराबादकर याची N.D.A. तील लष्करी प्रशिक्षणासाठी निवड झाली. महाराष्ट्रातील हा एकमेव विद्यार्थी यावर्षी निवडला गेला.

शाळेच्या स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून इ. ५वी साठी मा. श्री. मधु नाशिककर, इ. ६वी साठी मा. श्री. यातिन ठाकूर, इ. ७वी साठी डॉ. सुधीर रानडे, इ.८वी साठी उद्योजक श्रीकृष्ण नाईक व दूरदर्शन निर्माते शरण बिराजदार, इ. ९वी साठी तरूण भारत चे श्री. अरूण करमरकर व इ. १० साठी मा. महापौर प्रेमसिंह राजपूत उपस्थित होते.

इ. १०वी च्या शुभेच्छा समारंभासाठी व पारिजातक या वार्षिकांकाच्या प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गप्पाष्टककार मा. श्री. संजय उपाध्ये उपस्थित होते.

ठाणे म.न.पा. अॅथलेटिक असोसिएशन आयोजित धावण्याच्या स्पर्धेत कु. प्रचिता पाटणकर हिला २ सुवर्ण १ कास्य १ रौप्य पदक प्राप्त झाले. तसेच मरीन लाईन्स मु. येथे कॅथलिक बांधवांनी आयोजित केलेल्या स्पर्धेतही तिला १ सुवर्ण व १ रौप्य पदक प्राप्त झाले. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याची प्रतिनिधी म्हणून तिची निवड झाली.

**महाविद्यालयाच्या परिसरात**

२७ फेब्रुवारी रोजी परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात हर्डेलियातून निवृत्त झालेले अधिकारी श्री. बळवंत गोडबोले यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावरील व्याख्यान तंत्र निकेतनातर्फे घेण्यात आले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांशी बोलताना श्री. गोडबोले यांनी व्यक्तिमत्व कसे सुधारावे, प्रतिकूल परिस्थितीतही कसे टिकून रहावे याचे अनुभवाच्या आधारे सोप्या भाषेत परिणामकारित्या सांगितले. प्रा. सौ. उषा राघवन यांच्या पुढाकाराने झालेल्या या व्याख्यानास प्राचार्य मुजुमदार, प्रा. नायक यांच्यासह अनेक शिक्षकही उपस्थित होते. याच प्रसंगी तृतीय वर्षाचा निरोप समारंभही झाला.

असेच एक व्याख्यान 'योगा फॉर गुड हेल्थ' या विषयावर तंत्रनिकेतनात आयोजित करण्यात आले होते. मात्र हे व्याख्यान शिक्षकांसाठीच होते. वैद्यकीय व्यवसायातील डॉ. वैजयंती इंगवले यांनी या भाषणात योगप्रकाराच मूलभूत विचार मांडून काही योगासनांचे प्रात्यक्षिके ही दाखविली. तंत्र निकेतनाच्या रसायन विभागातील सौ. इंगवले यांनी त्यांचा परिचय करून दिला तर सौ. उषा राघवन यांच्या हस्ते त्यांचा छोटेखानी गौरव करण्यात आला.

**पॉलिझिन**

पॉलिझिन या वार्षिक अंकाचा प्रकाशन सोहळा तंत्रनिकेतन तर्फे थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून टेक्निकल एज्युकेशनचे डेप्युटी डायरेक्टर श्री. एस्. जी. खरे उपस्थित होते.

ईशस्तवन, सरस्वती पूजन, स्वागत झाल्यावर प्राचार्य मुजुमदार सरांनी आपल्या प्रास्ताविकात तंत्रनिकेतनच्या प्रगतीचा आढावा घेतला. उपप्राचार्य श्री.

नायक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण साहित्याने नटलेल्या पॉलिझिनचे प्रकाशन झाले. यंदाच्या संपादन समिती प्रमुख संपादिका सौ. एस. एस. कुलकर्णी या होत्या. विद्यार्थ्यांना पारितोषिके समारंभापूर्व वितरित करण्यात आली.

या वेळी बोलताना श्री. खरे म्हणाले, '' या अंकातील लेखन खरोखरच कौतुकास पात्र आहे. अशीच साहित्य गुणांमध्ये वाढ झालेली पहायला मिळावी.'' स्वानुभवांचा आपल्या भाषणात यथोचित उल्लेख माजी करून विद्यार्थ्यांचा संघ निर्माण होणे या तंत्रनिकेतनाचे यश आहे असे ते म्हणाले.समारंभास डॉ. वा. ना. बेडेकर, कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू, प्राचार्य मुजुमदार व नायक सर हे मान्यवर तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्ष स्थान भुषविणारे डॉ. वा. ना. बेडेकर या प्रसंगी म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी नेहमी जागरूक राहून नावीन्य निर्माण केले पाहिजे. या अंकातील चारोळ्या आपल्याला आवडल्या.'' अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी देताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या घोषणेचे स्वागत केले. प्रा. सौ. के. एस. आगाशे यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**पुन्हा एकदा गणेश**

गणेश खराडे या आमच्या कला महाविद्यालयात तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने आपल्या महाविद्यालयाची जीवनाची तीनही वर्षे आदर्श वागून , लोकप्रिय केली. गणेश पुढील जून नंतर आमचा माजी विद्यार्थी असेल पण तीन वर्षात त्याने मिळविलेले प्रेम, गुरुजनांबद्दल दाखवलेला आदर, विविध कार्यक्रमात मिळविलेली असंख्य पारितोषिके, त्याची धडपड, त्याचा अभ्यास.... अनेक कारणांनी गणेश महाविद्यालयात आठवणीत राहणार आहे. कमी तेथे आम्ही आणि गो गेट इट. या दोन्ही गटात गणेश मोडतो. त्याची जिद्द, आव्हानाला सामोरे जाण्याची तयारी ... सर्वच या सम हा या पद्धतीचे होते.




**९७-९८ चा नवरंग किंग गणेश**
**मिळविलेल्या पारितोषिकांसह भविष्यात नजर रोखून**

गेला दोनचार महिन्यापूर्वी गणेश विद्यापीठातर्फे काश्मीरात राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी जाऊन आला. तेथील त्याचा वृतांत 'अतिरेक्यांच्या राज्यात' या नावाने आम्ही स्वतंत्रपणे याच अंकात देत आहोत. त्यामुळे तेथे काय घडलं याची येथे पुनरावृत्ती टाळत आहोत.

दिशाचा नियमित वाचक असणाऱ्या गणेशचे दिशा तर्फे हार्दिक शुभेच्छा !

**वासुदेव देशपांडे**

गणेश इतका नाही, पण आमच्या वाणिज्य महाविद्यालयातला वासुदेव देशपांडेही सतत ॲक्टीव होता. आज नाही उद्या वक्तृत्वास चमकू शकेल असे गुण आमच्या वासुदेव मध्ये आहे. या वर्षात वासुदेवने मिळविलेली पारितोषिके

नवरंग ९८ - व्यक्तिमत्व स्पर्धा - प्रथम क्रमांक

डायमेन्शन ९८ - मुलुंड, वझे महाविद्यालयाच्या स्पर्धेत वादविवादात - प्रथम क्रमांक

स्पेस ९९ - सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी - वादविवादात द्वितीय क्रमांक

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगाव स्पर्धेत वक्तृत्वात तृतीय क्रमांक

प्रबोधन, या वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ

एरोनॅटिक सोसायटी ऑफ इंडिया - यांच्या वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ

### व्यवस्थापन संस्था


आमच्या व्यवस्थापन विभागातर्फे मुंबई व्यवस्थापन संघाच्या सहकार्याने दि. १५ जानेवारी रोजी डॉ. एस. के. पारुख यांचे तणावाचे व्यवस्थापन या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांच्या परिचय श्री. एम. आर. भोळे यांनी करून दिला. संगीताची सांगड घालून आपण तणावापासून कसे मुक्त होऊ शकतो या विषयावर त्यांनी अभ्यासपूर्वक विचार मांडले. दीर्घ श्वसन व संगीताची प्रात्यक्षिकेही या वेळी त्यांनी करून दाखविली. या कार्यक्रमास या विभागाचे निदेशक श्री. लाड, कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ. धों. टिळू, श्री. दिलीप जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

आमच्या महाविद्यालयाच्या संयुजा या वार्षिक अंकाचे प्रकाशन आमच्याच कला वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. संतोष राणे यांच्या हस्ते संपन्न झाले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सी. जी. पाटील होते.

संयुजाच्या संपादन समिती प्रमुख प्रा. एस. एन. जोगळेकर, प्रा. कल्पना फळ, प्रा. मोझेस कोलेट आदी प्राध्यापक व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. प्रा. राणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### कोचिंग क्लासेस एक सर्वेक्षण



मुंबई विद्यापीठाने गेल्या वर्षापासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयासाठी एक प्रकल्प सक्तीचा केला असून, आमच्या बांदोडकर महाविद्यालयातील एफ. वाय. बी. एससी. च्या संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी त्या अंतर्गत कोचिंग क्लासेसविषयी एक सर्वेक्षण केले. त्यानुसार, तब्बल ७६ टक्के पालक अथवा विद्यार्थ्यांनी कोचिंग क्लासेस अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

क्लासेस मधून दिल्या जाणाऱ्या 'नोट्स' व परीक्षाधिष्ठित अभ्यास यामुळे विद्यार्थ्यांना क्लासेस महत्त्वाचे वाटतात. तसेच, विद्यार्थ्यांना आलेल्या सर्व अभ्यासविषयक शंका क्लासमधील शिक्षक सोडवितात, असे अनेकांचे मत असल्याचे आढळून आले. मात्र, क्लासेस केवळ अभ्यासात दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जास्त उपयोगी ठरतात, असे मत पाहणी केलेल्या निम्म्या लोकांनी व्यक्त केले आहे. क्लासेस हुशार विद्यार्थ्यांसाठीच असतात, असे केवळ १९ टक्के लोकांना वाटते, तर ते हुशार व अभ्यासात फारशी गती नसलेले अशा दोघांसाठी असतात, असे मत २८ टक्के लोकांनी व्यक्त केले.

कोचिंग क्लासेस कितीही महत्त्वाचे असले तरी ते शाळा अथवा महाविद्यालये यांना पर्याय ठरू शकत नाहीत, असे बहुतांश लोकांना वाटते. क्लासेसला जात असले तरी विद्यार्थ्यांनी शाळा अथवा महाविद्यालयातील वर्ग बुडवू नयेत, असे मत ८९ टक्के लोकांनी व्यक्त केले. दोन तृतीयांश लोकांनी असेही म्हटले आहे की क्लासेसना शाळा किंवा महाविद्यालयांचे स्थान देण्यात येऊ नये. मात्र शाळा महाविद्यालयांतील शिक्षकांनी क्लासेसमध्ये शिकवू नये वा त्यांना क्लासेसमध्ये शिकविण्याची परवानगी अधिकाऱ्यांनी देऊ नये, असेही त्यांनी म्हटले आहे.

क्लासेससंबंधी प्रचलित अनेक समजुती या पाहणीनंतर मोडीत निघू शकतात. उदाहरणार्थ, आपापल्या शिक्षकांच्या क्लासेसमध्ये प्रवेश न घेतल्यास या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचा छळ होतो, या समजुतीला केवळ १० टक्के विद्यार्थ्यांनी विरोध केला. तर, कोचिंग क्लासला जाणे ही केवळ फॅशन अथवा फॅड आहे, यालाही २० टक्के विद्यार्थ्यांनीच पाठिंबा दिला. शाळांमधील मोठी विद्यार्थीसंख्या प्रचंड अभ्यासक्रम, मर्यादित काळ व काही मस्तीखोर विद्यार्थी यांच्यामुळे शिक्षकांना वर्गात व्यवस्थित शिकविता येत नाही, असे मतही अनेकांनी व्यक्त केले.

बांदोडकर महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील यांनी या प्रकल्प पाहणीसाठी विद्यार्थ्यांना मदत केली. विद्यापीठाची सर्व विद्यार्थ्यांना प्रकल्पात सहभागी करण्याची योजना अतिशय स्वागतार्ह असून सर्व महाविद्यालयांमध्ये ती योग्य रीतीने राबविल्यास विद्यार्थ्यांचाच फायदा होईल, असे प्रा. अशोक पाटील म्हणाले.

**समर्थी**

ठाण्याची स्थानिक वृत्तपत्रे आमच्या मंडळाला व मंडळाच्या शैक्षणिक संस्थांना वेळोवेळी प्रसिद्धी देत आलेली आहेत. ठाण्यातील सर्वात जुने वृत्तपत्र दै. सन्मित्र यातून आमचा वार्षिकांकांवर अतिशय अभ्यासपूर्ण परिचयात्मक लेख समर्थी यांनी लिहिले. गतवर्षी ही त्यांनी असे लेख लिहिले होते. आमच्या सर्व संस्थांतर्फे त्यांचे आभार !

• • •

(पान क्र. २४ वरून)

**साक्षरता अभियान**

मीसुद्धा माझी भूमिका समजते. मी या अभियानातील माझा वाटा उचलला आहे.

जोवर मी एकतरी निरक्षर व्यक्तीला संपूर्णपणे साक्षर करणार नाही तोपर्यंत गप्प बसणार नाही, असा मी पण केला आहे. मी ही माझ्या एकटीची लढाई समजून त्याला तोंड देणार आहे. मला असा आत्मविश्वास वाटतो की, मी एका तरी निरक्षराला साक्षर करून हे युद्ध जिंकणार आहे.

मी माझ्या सारख्या अनेक मित्रांना उत्साहित करते आणि करत राहणार की, आपण एकामागून एकेक निरक्षराना जो पर्यंत साक्षर करु किंवा करण्याचा प्रयत्न करु जोवर संपूर्ण भारत साक्षर होत नाही. तेव्हाच माझ्या साक्षरतेचा उपयोग होईल. मनाला तृप्त करणारी शीतलता मिळेल. "स्वच्छ भारत, सुंदर भारत, साक्षर भारत", असे उद्गार जेव्हा प्रत्येकाच्या तोंडी असतील तेव्हाच साक्षरता अभियान पूर्ण होईल.

मित्र हो ! माझी किंवा तुमची किंवा आपल्या सगळ्यांचीच भूमिका जरी केवळ शिकविण्याची असली तरी ती महान आहे. मी माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून आमच्या वस्तीतल्या प्रौढ व्यक्तीला शिकवले, साक्षर केले. आता तो प्रौढ फार चांगल्या प्रकारे लिहू-वाचू शकतो. याचा मला अभिमान वाटतो आणि साक्षरता अभियानातील माझी भूमिका मी पार पाडू शकले, याचा ही मला आनंद ही होत आहे.

आणि शेवटी जे निरक्षर राहतील व जे या कार्यक्रमात येणार नाहीत त्यांना एकचं विनंती वजा घोषणा करावी वाटते. ती म्हणजे-

*"निरक्षरतेचा नाश करा ।*
*साक्षरतेची वाट धरा ॥*
*निरक्षरांचे घालवी अज्ञान ।*
*हीच साक्षरांची शान ॥*
*तपाविना देव नाही ।*
*साक्षरतेविना जीवन नाही ॥"*
*धन्यवाद ! जयहिंद ! जय महाराष्ट्र !!*

• • •